# विदर्भ प्रजासत्ताक

RNI No. - MAHMAR 2023/84526

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -१९५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि.२९ ऑगस्ट २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## गुजरात, दिल्लीमध्ये पावसाचे थैमान; छतावर आली मगर, अनेकांना गमवावा लागला जीव

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९ पोरबंदर**



गुजरातमध्ये मुसळधार पावसाने कहर केला आहे. परिसर, घरं आणि सोसायट्या पाण्याखाली गेल्याचं दिसत आहे. हवामान खात्याच्या म्हणण्यानुसार जोरदार पावसाची शक्यता आहे. मच्छिमारांना पुढील दोन दिवस समुद्रात न जाण्यास सांगण्यात आलं आहे. तसेच गुरुवारी सकाळपासून दिल्ली-एनसीआरमध्ये सतत पाऊस पडत आहे, त्यामुळे शहरातील अनेक भागात पाणी तुंबण्याची आणि वाहतूक कोंडीची परिस्थिती निर्माण झाली आहे.

जुनागडचा मानवदर पोरबंदर रोड पुराच्या पाण्याखाली गेला होता. त्यामध्ये चार जण अडकले होते. जिल्हा प्रशासनाला याबाबत माहिती मिळताच राज्य आपत्ती निवारण दलाचे जवान बचाव बोटीसह घटनास्थळी पोहोचले आणि चारही जणांची सुटका केली. पावसामुळे गुजरातमधील वडोदरातील अकोटा स्टेडियम परिसर जलमय झाला आहे. पाणी इतके भरले की नंतर घराच्या छतावर एक मगर दिसली.अहमदाबादमध्ये देखील असंच चित्र पहायला मिळत आहे. निवासी भागात मगर फिरताना दिसत आहेत. नवागाम घेडे परिसरात अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्यासाठी स्थानिक आमदार आणि क्रिकेटपटू रवींद्र जडेजा यांच्या पत्नी रिवाबा जडेजा घटनास्थळी पोहोचल्या आणि लोकांना मदत केली. रहिवासी भागात पाणी इतक्या वेगाने आले की लोकांना बाहेर पडायला वेळ मिळाला नाही.

गुजरातमध्ये पावसाशी संबंधित अनेक घटनांमध्ये आणखी १९ जणांचा मृत्यू झाला आहे. अशाप्रकारे तीन दिवसांत पावसामुळं जीव गमावणाऱ्यांची संख्या २६ झाली आहे. याचबरोबर, आतापर्यंत पूरग्रस्त भागातून १७,८०० लोकांना सुरक्षितस्थळी हलवण्यात आले आहे. पोलीस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी मोरबी जिल्ह्यातील हलवद तालुक्यातील धवना गावाजवळ पूल ओलांडताना ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये वाहून गेल्याने बेपत्ता झालेल्या सात जणांचा मृत्यू झाला. या पुलावरून पाणी वाहत होते. त्यांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत.

## पोल्ट्री फार्म ते खासदारकी; सुषमा अंधारेंनी राणेंचा इतिहासच काढला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९ पुणे**

मालवणमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळ्याचं समोर आलंय. या घटनेनंतर राज्यातील राजकीय वातावरण चांगलच ढवळून निघाल्याचं दिसून येत आहे. पुतळ्याच्या कामात भ्रष्टाचार ते घाईगडबड केल्याचा सूर विरोधकांकडून आवळण्यात येत आहे. अशातच आता ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी शिवरायांच्या पुतळ्याच्या मुद्द्यावरुन भाजपच्या नेत्यांवर जोरदार हल्लाबोल केलायं. यावेळी बोलताना सुषमा अंधारे यांनी भाजपचे खासदार नारायण राणे यांचा पोल्ट्री फार्म ते खासदाराकीपर्यंतचा सगळा इतिहासच सांगितलायं. त्या पुण्यात बोलत होत्या.

सुषमा अंधारे म्हणाल्या, नारायणराव आम्हाला तुमचा पोल्ट्री फार्मपासूनचा इतिहास चांगलाच माहित आहे, तुम्ही कणकवलीला गुन्हेगारांचा आखाडा केला असून श्रीधर नायकांच्या हत्येचा मुख्य आरोपी तुम्ही होता. सत्यजित भिसेची कणकवलीत हत्या झाली,



त्याचाही आरोप तुमच्यावर होता. त्यानंतर राणेंचे चुलत भाऊ अंकुश यांचा मृतदेह सिंधुदूर्गला विकृत अवस्थेत मिळाला होता, हा तुमचा संपूर्ण इतिहास असल्याची खोचक टीका सुषमा अंधारे यांनी केलीयं.तसेच मुलुंडचा एचडी व्हिडिओ स्पेशालिस्ट किरीट सोमय्या याने घोटाळा काढून तुमच्या मागे लावली होती. तेव्हा तुम्ही सोनिया गांधी यांच्या पायावर हुजरे आणि मुजरे करण्यासाठी दिल्लीच्या वाऱ्या करीत होता. तुम्हाला जेवणाच्या ताटावरून अटक करावी लागली कारण तुम्ही महाराष्ट्रातल्या सत्यजित भिसे, श्रीधर नाईक, अंकुश राणे यांना तुम्ही भरल्या ताटावरून उठवले असल्याचीही टीका अंधारे यांनी केलीयं.


## मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगेंचे २९ सप्टेंबरपासून पुन्हा उपोषण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९जालना**

मराठा आरक्षणासाठी लढणारे मनोज जरांगे यांनी पुन्हा एकदा आरक्षणाचं हत्यार उपसलं असून २९ सप्टेंबरपासून आमरण उपोषण करण्याचा निर्धार त्यांनी जाहीर केला. जोपर्यंत मराठा समाजाला आरक्षण मिळणार नाही तोपर्यंत हे उपोषण सुरूच राहणार असं त्यांनी जाहीर केलं. मनोज जरांगे यांनी यावेळी देवेंद्र फडणवीसांवर जोरदार टीकाही केली. अंतरवाली सराटी येथे त्यांनी हा निर्णय जाहीर केला. मात्र मनोज जरांगे यांच्या या निर्णयाला उपस्थित आंदोलकांनी विरोध केला असून जरांगे यांनी निर्णय मागे घ्यावा अशी विनंती केल्याचं दिसून आलं.

ओबीसी प्रवर्गातून मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीसाठी म्हणून जरांगे यांनी २९ ऑगस्ट २०२३ रोजी जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी मधून आंदोलन सुरू केलं होतं. या आंदोलनाची वर्षपूर्ती झाल्याच्या निमित्ताने मनोज जरांगे यांनी गोदापट्ट्यातील १२३ गावांच्या आंदोलक समन्वयकांची बैठक बोलावली होती. त्यानंतर त्यांनी पुन्हा एकदा आंदोलन करणार असल्याचं जाहीर केलं.

### फडणवीसांचे ११३ आमदार पाडण्याचा निर्धार




मनोज जरांगे यांनी यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री आणि भाजप नेते देवेंद्र फडणवीसांवर टीका केली. देवेंद्र फडणवीसांचे ११३ आमदार पाडणार असं जरांगे म्हणाले. भाजपमधील सगळे मिळून फडणवीसांचा काटा काढणार, त्यांना राजकारणात ठेवणार नाहीत असं त्यांचे लोक आपल्याजवळ येऊन बोलतात असं जरांगेंनी म्हटलंय. फडणवीसांचे लोक आपल्याला रात्री येऊन भेटतात असा दावा मनोज जरांगे यांनी केला. भुजबळांपेक्षाही अधिक जातीयवाद हा फडणवीसांनी पसरवला अशी टीका मनोज जरांगेंनी केली. मनोज जरांगे म्हणाले की, मी समाजाला शब्द दिला होता मी आरक्षण मिळेपर्यंत हटणार नाही. पुन्हा एकदा सहा कोटी मराठा एकत्र आणणार. मराठा आरक्षणासाठी बलिदान दिलेल्या कुटुंबांना न्याय देण्याची जबाबदारी माझी. जीवनात आल्यानंतर कधी ना कधी मरण आहेच. माझा समाज अडचणीत आहे. त्यामुळे २९ सप्टेंबरला उपोषण होणारच. तुम्ही मला इथे बसू दिलं नाही तर दवाखान्यात जाऊन मी उपोषण करणार. मुंबईला जाऊ, सरकारही पाडू, पण उपोषण करणारच.

## अजित पवार गट मुक आंदोलनावर रोहित पवारांची सडकून टीका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९मुंबई**

मालवणच्या राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा कोसळल्याची घटना तीन दिवसांपूर्वी घडली. या घटनेनंतर महायुती सरकार विरोधात राज्यभरात महाविकास आघाडीकडून ठिकठिकाणी आंदोलन करण्यात येत आहे. आता सत्तेत सहभागी असलेला अजित पवार गटही मुक आंदोलन करणार आहे. मात्र, त्यांच्या या आंदोलनावर आता शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी टीका केली.



रोहित पवार यांनी सोशल मीडिया अकाऊंट एक्सवर एक पोस्ट केली. या पोस्टमध्ये अजित पवार यांच्यावर नाव न घेता टीका केली. रोहित पवारांनी लिहिलं की, महिलांवरील वाढते अत्याचार, प्रत्येक कामात दलाली खाण्याची सरकारची प्रवृत्ती यामुळे राज्यभरात संतापाची लाट निर्माण झाली असून याचा भाजपने प्रचंड धसका घेतला आहे. या रोषाचा फटका बसून नये म्हणून मतविभाजन करण्यासाठी सरकारमधील एका गटाला तिसरी आघाडी स्थापन करण्याचे दिल्लीवरून आदेश दिल्याचे तसेच या दिल्लीच्या आदेशाला मूर्त रूप देण्यासाठी एक गट सरकारविरोधात आंदोलन करत असल्याची चर्चा आहे. असो, आंदोलन केल्यानं त्या गटाला तिसरी आघाडी स्थापन करण्याचा मार्ग मोकळा होईल, पण दलाली खाण्याच्या ज्या पापाचे भागादीर आहात, त्या पापातून मुक्ती मात्र कदापि मिळणारनाही, हे मात्र लक्षात असू द्या.., असं रोहित पवार म्हणाले.

## सरपंचांसाठी गुडन्यूज! मानधनवाढीचा प्रस्ताव होणार मंजूर; गिरीश महाजनांचा शब्द

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९ मुंबई**

राज्यातील ग्रामपंचायतींच्या विविध मागण्यांसाठी अखिल भारतीय सरपंच परिषदेच्या नेतृत्वात आंदोलन सुरू करण्यात आले होते. या आंदोलनाला मोठं यश आलं आहे. राज्याचे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी सरपंचांच्या मागण्या मान्य केल्या आहेत. त्यांच्या यशस्वी मध्यस्थीनंतर आंदोलन स्थगित करण्यात आले. सरपंचांच्या मानधनात वाढ करण्याचा प्रस्ताव आठवडाभरात मान्य करण्यात येईल अशी माहिती मंत्री महाजन यांनी दिली.



राज्यातील ग्रामपंचायतींना निधी देण्यासाठी सरकार सकारात्मक आहे. त्यामुळे या प्रश्नाबाबत काहीतरी तोडगा नक्कीच काढला जाईल. सरपंचांना मिळणारं मानधन कमी आहे यात वाढ करावी अशी मागणी सरपंचांनी केली होती. आता येत्या आठ दिवसां मंत्रिमंडळाच्या बैठकीत याबाबत निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन महाजन यांनी दिले.

## 'तो' सर्व्हे काँग्रेसचा नाही, मविआला महाराष्ट्रात एवढ्या जागा मिळतील, नाना पटोलेंचा दावा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९मुंबई २४**

महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक जसजशी जवळ येत आहे, तसतसे प्रसारमाध्यमांमधून वेगवेगळ्या संस्थांचे सर्व्हेही प्रसिद्ध होऊ लागले आहेत. दरम्यान, काल काँग्रेसचा अंतर्गत सर्व्हे असल्याचा दावा करत एक सर्व्हे प्रसिद्ध झाला होता. या सर्व्हेमधून राज्यात महाविकास आघाडीला बहुमत मिळेल, तसेच काँग्रेस राज्यातील सर्वात मोठा पक्ष ठरेल, असा दावा करण्यात आला होता. मात्र काँग्रेसचा अंतर्गत सर्व्हे असा दावा करत प्रसिद्ध करण्यात आलेला हा सर्व्हे काँग्रेसने केलेलाच नसल्याचे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी स्पष्ट केले आहे. तसेच येत्या विधानसभा



निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीला महाराष्ट्रात २०० हून अधिक जागा मिळतील, असा दावाही नाना पटोले यांनी केला.

माध्यमांमध्ये प्रसारित होत असलेल्या काँग्रेसच्या सर्व्हेबाबत स्पष्टीकरण देताना नाना पटोले म्हणाले की, हा सर्व्हे काँग्रेसचा नाही आहे. त्याबाबत प्रसारमाध्यमांमधून चुकीची माहिती प्रसारित होत आहे. प्रत्यक्ष जमिनीवर काय वातावरण आहे, याचा अंदाज आम्हाला आहे. लोकसभा निवडणुकी वेळीही आम्ही तसा अंदाज सांगत होतो. आता विधानसभा निवडणुकीवेळीही राज्यात महाविकास आघाडीच्या बाजूने वातावरण आहे. त्यामुळे महाविकास आघाडी महाराष्ट्रामध्ये २०० च्या वर जागांवर विजयी होईल. असा आम्हाला विश्वास आहे, असा दावा नाना पटोले यांनी केला.

दरम्यान, विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसने केलेला अंतर्गत सर्व्हे म्हणून काल एक सर्व्हे प्रसिद्ध झाला होता. या सर्व्हेमध्ये राज्यात काँग्रेस सर्वात मोठा पक्ष ठरणार असून, काँग्रेसला ८० ते ८५ जागा मिळतील, अशी शक्यता वर्तवण्यात आली होती.




## संपादकीय ......

# बरे झाले, शहाणपण आले!

बदलापूर येथील एका शाळेत दोन बालिकांवर जो लैंगिक अत्याचार झाला, त्यावरून जनतेचा उद्रेक झाला. त्यात शाळा प्रशासन आणि पोलिसांच्या दिरंगाईची भर पडली. अशा प्रकारच्या घटनांचा जितका निषेध करावा तितका कमीच आहे.

बदलापूर भागात आणि रेल्वे स्थानकात लोकांचे दिवसभर आंदोलन सुरू होते. सुरूवातीला पोलिसांनी आंदोलकांना हटविण्याचा प्रयत्न केला, पण लोकांचा आक्रमक पवित्रा पाहून पोलिसांनीही सबुरीने घेण्याचे ठरवले. त्यानंतर पोलिसांनी लोकांना विनंती करून शांत करण्याचा प्रयत्न केला. हा उद्रेक इतका तीव्र कसा काय होता, त्यावरून दुसर्या दिवशी मुख्यमंत्र्यांनी यामध्ये विरोधकांचा हात असण्याची शक्यता व्यक्त केल्यानंतर विरोधक संतापले.त्यानंतर महाविकास आघाडीचे घटक पक्ष असलेल्या उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना, शरद पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस यांनी राज्य सरकारच्या निषेधार्थ शनिवारी २४ ऑगस्टला महाराष्ट्र बंद पुकारला होता. महिला आणि मुलींचे रक्षण करण्यात राज्यातील सत्ताधारी महायुतीचे सरकार अपयशी ठरले आहे, त्यामुळे लोकांच्या भावना व्यक्त करण्यासाठी आम्ही हा महाराष्ट्र बंद पुकारला आहे, असे महाविकास आघाडीच्या नेत्यांचे म्हणणे होते.

यासाठी पहिल्यांदा उद्धव ठाकरे यांनी आपली भूमिका मांडली. लोकांनी या बंदमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले. बंद म्हटले की, राज्यातील सर्व व्यवहार ठप्प होतात, त्यात आता पुन्हा गणेशोत्सव अगदी जवळ आलेला आहे, अशा वेळी बंदमुळे अनेक व्यावसायिकांचे नुकसान होते तसेच बंदच्या वेळी जर का तणाव निर्माण झाला तर सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होऊ शकते. या सगळ्यांचा विचार करून उद्धव ठाकरे यांनी सुरुवातीला शनिवारी दुपारी २ वाजेपर्यंत महाराष्ट्र बंद करण्याचे आवाहन केले.

खरे म्हणजे एकेकाळी मुंबई बंद ही शिवसेनेची ताकद म्हणून ओळखली जात असे. मुंबईसारखे शहर जे कधी झोपत नाही ते जर कुणी बंद करू शकत असेल तर ती शिवसेना. सध्या उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचा पडता काळ आहे. कारण एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेत बंड करून भाजपच्या मदतीने मूळ शिवसेनेचे नाव, चिन्ह आपल्याकडे घेतले. नव्हे तर त्याअगोदर अनेक आमदार, खासदार त्यांनी आपल्या बाजूला आणले.

त्यामुळे उद्धव ठाकरे यांच्यासमोर नव्याने पक्ष उभारण्याचे आव्हान आहे. बंद हे कुठल्याही राजकीय पक्षाचे शक्तीप्रदर्शनाचे एक प्रभावी साधन असते. बंद किती प्रमाणात यशस्वी झाला, यावरून तो पुकारणार्या राजकीय पक्षाची ताकद दिसून येत असते. पण ताकद दाखवली जात असताना जनसामान्यांना त्याचा किती त्रास होतो, याचा संप करणारे विचार करत नसतात. जर विषय जनतेच्या भावनांशी निगडित असेल तर मग सगळेच त्या भावनेच्या लाटेवर स्वार होण्यासाठी हातघाई करत असतात.

एखादी लांच्छनास्पद घटना घडली तर त्याला कारणीभूत असलेल्या लोकांना शिक्षा व्हायलाच हवी, पण ते करत असताना राजकीय पक्षांकडून त्या वेदनेचा राजकीय फायदा घेतला जाण्याची शक्यता असते. अर्थात, बरेचदा राजकीय पक्षांचा रेटा नसेल तर संबंधित यंत्रणा हलत नाही, हेही लक्षात घ्यावे लागेल. बदलापूरच्या घटनेत हेच दिसून आले. जेव्हा शाळा प्रशासन आणि पोलीस मुलींच्या पालकांची दखल घेईनासे झाले तेव्हा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकार्यांनी पुढाकार घेतला, तेव्हा पोलिसांनी दखल घेतली.

बदलापूर घटनेच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीने जो महाराष्ट्र बंद पुकारला त्याविरोधात गुणरत्न सदावर्ते मुंबई उच्च न्यायालयात गेले. त्यानंतर न्यायालयाने हा बंद बेकायदेशीर ठरवून बंद करणार्यांवर कायदेशीर कारवाई करण्याचे राज्य सरकारला आदेश दिले. त्यानंतर महाविकास आघाडीने बंद करण्याचा निर्णय मागे घेतला. आता हीच गोष्ट सगळ्याच राजकीय पक्षांनी आणि त्यांच्या नेत्यांनी लक्षात ठेवण्याची गरज आहे. कारण जे आज सत्तेत आहेत ते उद्या विरोधात असू शकतात.

बदलापूरमधील शाळेत जी घटना घडली, तशा गुन्ह्यातील आरोपींना वेळीच शिक्षा झाली तर तसे गुन्हे करण्याचा जे विचार करत असतील, त्यांना वेळीच जरब बसेल आणि तसे गुन्हे घडणार नाहीत. निरपराध मुलींवर असे प्रसंग ओढवणार नाहीत, पण अशा प्रसंगात जर आरोपींवर वेळीच कारवाई झाली नाही तर कायद्याचा जो धाक असायला हवा तो राहत नाही. जेव्हा अशा घटना घडतात तेव्हा राजकीय नेत्यांकडून कायदे कडक करण्यात येतील, असे सांगितले जाते, पण कायदे कितीही कडक असले तरी त्याला फाटे फोडले जातात आणि त्यातून हुशार वकील मंडळी आरोपीला पळवाट दाखवतात.

त्यामुळे असे गुन्हे केले तरी त्यातून पळवाट असू शकते, त्यातून सुटता येते, अशी भावना बळावली की, मग अपराध करणार्यांच्या मानसिकतेवर कायद्याच्या भीतीचा जो वचक असावा लागतो तो रहात नाही. त्यामुळे अशा वेळी न्यायालयांची भूमिका फार महत्त्वाची ठरते. राजकीय पक्षांनी बंद केल्याबद्दल न्यायालयाने यापूर्वी दंड भरण्याचे आदेश दिले होते. त्यामुळे बंद करतानाही राजकीय पक्षांना विचार करावा लागतो. न्यायालयाचा वचक आहे, म्हणून हे शक्य आहे. न्यायालयांनी अशी अत्याचाराची प्रकरणे फास्ट ट्रॅकवर चालवली आणि आरोपींना वेळीच शिक्षा दिली, तर अशा प्रकारच्या गुन्हेगारीला आळा बसेल.




## मोड आलेली कडधान्य खाता, पण प्रोटीन मिळतं का? ७ गोष्टी विसरु नका, तरच मिळेल भरपूर प्रोटीन...

**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक** – मोड आलेली कडधान्ये खाणे आरोग्याच्या दृष्टीने अतिशय चांगले असते. आपण बहुतेकवेळा सकाळचा नाश्ता किंवा दुपारच्या जेवणात मोड आलेली कडधान्ये खातो. चांगल्या आरोग्यासाठी आपल्या रोजच्या डाएटमध्ये कडधान्यांचा समावेश असावा असे सांगितले जाते. कडधान्ये प्रोटिन्स आणि इतर महत्वाच्या पोषक घटकांचा उत्तम स्रोत असल्याने ही कडधान्ये खाल्ली जातात. मोड आलेली कडधान्ये शरीराला पोषण देणारी असतात. वजन कमी करण्यासाठी, रोग प्रतिकारकशक्ती वाढवण्यासाठी, शरीराची झीज भरुन काढण्यासाठी मोड आलेली कडधान्य खाण्याला खूप महत्व दिले जाते. नुसत्या कडधान्यांपेक्षा मोड आलेली कडधान्ये आरोग्यासाठी अधिक पौष्टिक मानली जातात कडधान्य खाण्याचा सगळ्यात उत्तम उपाय म्हणजे त्यानं मोड आणून खाणं. कडधान्यांना मोड येतात तेव्हा त्यातील पोषक तत्वांच्या घटकांची फार मोठ्या प्रमाणात वाढ होते. कडधान्य खाण्याने जसा आपल्या आरोग्याला चांगला फायदा होतो तसेच त्याचे काही दुष्परिणाम देखील आहेत. काहीवेळा कडधान्य खाल्ल्याने पोटात गॅस, ब्लोटिंग, ॲसिसिडिटी, अपचन सारख्या समस्या निर्माण होतात. त्यामुळे कडधान्य खाताना काही महत्वाच्या गोष्टी लक्षात ठेवून काळजी घेतली पाहिजे. कडधान्य खाताना काही साध्यासोप्या गोष्टी लक्षात ठेवल्या तर त्याचा आरोग्याला त्रास न होता कडधान्ये खाण्याचे योग्य फायदे मिळतील.




**कडधान्य खाताना लक्षात ठेवा...**

१. मोड आलेली कडधान्ये पचायला थोडी जड असतात. यामुळे आपल्या पोटात गॅस तयार होऊ शकतो. कच्ची कडधान्ये खाल्ल्याने पोटात गॅस, ब्लोटिंग, ॲसिसिडिटी, अपचन सारख्या समस्या निर्माण होतात. त्यामुळे कच्ची कडधान्ये कधीच खाऊ नयेत. कडधान्ये नेहमी उकडून किंवा किंवा थोड्याशा तेलात फ्राय करुनच खावीत.

२. कडधान्ये आठवड्यातून फक्त दोन ते तीन वेळाच खावीत.

३. बारीक मोड आलेली कडधान्ये खाण्यास योग्य असतात. कडधान्यांना फार मोठे मोड आणू नये. बेताचेच मोड आणावेत. अगदी लहानही नको पण अगदी मोठेही नको.

४. मोड आलेली कडधान्ये शक्यतो कच्ची खाऊ नयेत. यामुळे बॅक्टेरियल इंन्फेक्शन आणि पोटाच्या अनेक समस्या निर्माण होऊ शकतात. मोड आलेली कडधान्ये चिमूटभर हळद घालून उकडवून खावीत. यामुळे कडधान्यांचे पचन चांगले होते. कडधान्य प्रेशर कुकरमध्ये घालून किमान त्यांना एक वाफ आणावी आणि मगच ती खावीत यामुळे कडधान्य बाधत नाहीत. कडधान्य पचायला सोपे होण्यासाठी तसेच त्यात जर काही सूक्ष्म जिवाणू असतील तर ते काढून टाकण्यासाठी कडधान्य शिजवली तर उत्तम.

५. मोड आलेली कडधान्य शक्यतो सकाळी नाश्त्याला आणि दुपारच्या जेवणात खावीत.

# कपाशीमध्ये दिसली डोमकळी तर समजून घ्या आली ही अळी.. करा हे सोपे उपाय

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक** यावर्षी पाऊस वेळेवर झाल्यामुळे बऱ्याच शेतकऱ्यांनी कापसाची लागवड ही लवकर केली आहे तसेच पाऊस हा गरजेनुसार पडत असल्यामुळे कापसाची वाढ ही समाधानकारक आहे त्यामुळे काही ठिकाणी कपाशीला फुले, बोंडे लागलेल्या ठिकाणी गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव आढळून येत आहे.

सद्या वातावरण ढगाळ व सतत रिमझिम पाऊस असल्याने व कापसाला पाते, फुले व काही प्रमाणात बोंडे लागत असल्याने गुलाबी बोंडअळीचे पतंग सक्रीय झालेले आढळून येत आहे.

मादी पतंग पाते, फुले, बोंडे यावर अंडी घालतात, तसेच कपाशी पिकाची लागवड एकाच वेळी न होता टप्पाटप्प्याने झालेली आहे, त्यामुळे किडीला सतत खाद्य उपलब्ध होत असल्याने गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे.

त्यामुळे सर्व शेतकऱ्यांनी सतर्क राहून प्रतिबंधात्मक उपाय म्हणून म्हणून कपाशीच्या पिकात कामगंध सापळे आत्तापासूनच लावणे गरजेचे आहे जेणेकरून होणारा प्रादुर्भाव आतापासूनच निरीक्षणाद्वारे कमी करता येईल आणि पुढे होणारे नुकसान कमी करता येईल.

**एकात्मिक व्यवस्थापन**

१) कपाशीच्या पिकात नियमित सर्वेक्षण करुन डोमकळ्या दिसून आल्यास त्या आतील अळीसह तोडून जमा करून जाळून अथवा जमिनीत पुरून नष्ट कराव्यात. यामुळे सुरुवातीच्याच टप्प्यांमध्ये गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव हा कमी राहून पुढील नुकसान टाळता येईल.

२) गुलाबी बोंडअळीसाठीचे कामगंध सापळे हेक्टरी ०५ या प्रमाणात पिकाच्या उंचीच्या एक ते दीड फूट उंचीवर लावावीत. याद्वारे गुलाबी बोंड अळीच्या प्रादुर्भावाची निरीक्षणे नोंदविता येतील.




३) मोठ्या प्रमाणात पतंग जमा करून नष्ट करण्यासाठी एका एकर क्षेत्रामध्ये गुलाबी बोंडअळीचे ८ ते १० कामगंध सापळे लावावेत.

४) ट्रायकोग्रामा बॅक्ट्री या परोपजीवी गांधीलमाशीने परोपजीवीग्रस्त झालेले ट्रायकोकार्ड प्रति एकरी २-३ (६०,००० अंडी) या प्रमाणात पीक ६० दिवसांचे झाल्यावर दोन वेळा लावावे.

५) ट्रायकोकार्ड शेतामध्ये लावल्यानंतर कमीत कमी १० दिवस पूर्वी व १० दिवस नंतर रासायनिक कीटकनाशकाची फवारणी टाळावी.

६) कपाशीचे शेतात पक्षांना बसण्यासाठी हेक्टरी किमान २५ पक्षी थांबे लावावेत, म्हणजे पक्षी त्यावर बसून शेतातील अळया खाऊन नष्ट करतील.

७) पाच टक्के निंबोळी अर्क किंवा अॅझाडिरेक्टीन १५०० पीपीएम ५०० मिली (२५ मिली प्रति दहा लिटर पाण्यात) किंवा बिव्हेरिया बॅसियाना या बुरशीयुक्त जैविक कीटकनाशकाची जमिनीत ओल व हवेत आर्द्रता असताना ८०० ग्रॅम (४० ग्रॅम प्रति दहा लिटर पाण्यात) प्रति एकर याप्रमाणात फवारणी करावी

**आर्थिक नुकसानीची पातळी**

कामगंध सापळ्यामध्ये सलग तीन दिवस ८ ते १० पतंग प्रति सापळा किंवा १ अळी प्रति १० फुले किंवा १० बोंडे किंवा १० टक्के प्रादुर्भावग्रस्त डोमकळ्या किंवा बोंडे दिसून आल्यास खालीलपैकी एका रासायनिक कीटकनाशकांची ची फवारणी करावी.

**फवारणीसाठी रासायनिक कीटकनाशके**

१) प्रोफेनोफॉस ५० टक्के ४०० मिली (२० मिली प्रति १० लिटर पाण्यात) प्रती एकर किंवा

२) इमामेक्टिन बेंझोएट ५ टक्के ८८ ग्रॅम (४.४ ग्रॅम प्रति दहा लिटर पाण्यात) प्रती एकर किंवा

३) इंडाक्झाकार्ब १४.५ टक्के २०० मिली (१० मिली प्रति १० लिटर पाण्यात) प्रती एकर किंवा

४) क्लोरपायरीफॉस २० टक्के ५०० मिली (२५ मिली प्रति १० लिटर पाण्यात) प्रति एकर आलटून पालटून फवारावे.

**फवारणी करताना घ्यावयाची विशेष काळजी**

१) वरील कीटकनाशका सोबत कुठल्याही प्रकारचे इतर कीटकनाशके, बुरशीनाशके, विद्राव्य खते,सूक्ष्म मूलद्रव्ये अथवा रसायने मिसळू नये.

२) लागोपाठ एकच एक कीटकनाशक फवारू नये.

३) फवारणी करिता दुषित पाणी न वापरता स्वच्छ पाणी वापरावे आणि पाण्याचे प्रमाण शिफारसितच वापरावे, कमी पाणी वापरल्यास फवारणीचे अपेक्षित परिणाम दिसून येत नाही.

४) किडनाशके फवारणी करताना योग्य ती संरक्षक विषयी काळजी घ्यावी.

**– डॉ.डी.डी.पटाईत, डॉ.जी.डी.गडदे आणि श्री.एम.बी.मांडगे**
**कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र, वनामकृवि, परभणी**
**०२४५२-२२९०००**

# प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रीया उद्योजकांसाठी सुवर्णसंधी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९ अमरावती,** प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना केंद्र पुरस्कृत योजना असून केंद्र आणि राज्य निधी हा ६०:४० या प्रमाणात आहे. अन्न प्रक्रिया उद्योग उभारणी करण्यास इच्छुक लाभार्थ्यांसाठी रोजगारांची संधी उपलब्ध होणार असून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी राहुल सातपुते यांनी केले आहे.

प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना सन २०२०-२१ ते २०२४-२५ पर्यंत कालावधीसाठी असणार आहे. या योजनेमध्ये नाशिवंत कृषी उत्पादने, तृणधान्य/ कडधान्य आधारित उत्पादन, तेलबिया आधारित उद्योग, मसाला उद्योग, दुग्धजन्य पदार्थाचे उत्पादन, मत्स्य खाद्य, कुकूट खाद्य, इत्यादी उद्योगाचा समावेश आहे. या योजनेअंतर्गत नवीन उद्योग व अस्तित्वातील सुक्ष्म प्रक्रिया उद्योगांचे आधुनिकीकरण करण्यासाठी अनुदान दिले जाते. सामाजिक पायाभूत सुविधा व विपणन ब्रँडिंग उत्पादनाकरिता अनुदान देय असेल. या योजनेअंतर्गत वैयक्तिक सूक्ष्म अन्न



प्रक्रिया उद्योजक, स्वयंसहाय्यता गटातील वैयक्तिक उद्योजक, स्वयंसहाय्यता गट तसेच शेतकरी उत्पादक गट किंवा सहकारी संस्था यांनाही अनुदान देय असणार आहे. वैयक्तिक लाभार्थी, स्वयंसहाय्यता गटातील वैयक्तिक लाभार्थी व स्वयंसहाय्यता गटास सुक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योगासाठी प्रकल्प खर्चाच्या ३५ टक्के किंवा जास्तीत जास्त १० लाख रुपये इतके अनुदान हे दिले जाईल. प्रकल्प उभारणीसाठी बँकेकडून कर्ज घेणे आवश्यक आहे. कर्ज घेतल्यावर कर्जाशिवाय प्रकल्पांमध्ये लाभार्थ्यांचा स्वतःचा हिस्सा किमान १० टक्के रकमेचा आवश्यक आहे. प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेअंतर्गत अमरावती जिल्ह्यात आजमितीस ६७० प्रकल्प प्रस्तावास कर्ज मंजुरी मिळालेली असून ४५० हून अधिक प्रकल्पास कर्ज वितरण झालेले आहे. प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजने अंतर्गत अमरावती जिल्ह्यात जिल्हा संसाधन व्यक्ती कार्यरत असून उद्योग संबंधी अधिक माहिती देणे, प्रकल्प अहवाल तयार करणे, बँकेत सादर केलेल्या प्रस्तावाचा पाठपुरावा करणे यासाठी निशुल्क सेवा पुरविण्यात येतात. योजनेच्या लाभाकरिता तालुकास्तरावर तालुका कृषि अधिकारी, मंडळ कृषि अधिकारी, योजनेचे संसाधन व्यक्ती, तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक, तसेच ग्रामस्तरावर गावातील संबंधीत गावाचे कृषि सहाय्यक व कृषि पर्यवेक्षक यांचेशी संपर्क करावा.

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत परिवहन महामंडळात प्रशिक्षणाची संधी

## शनिवारी मेळाव्याचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अमरावती,** युवकांना उत्तम दर्जाचे प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ अमरावती विभागात विविध पदावर प्रशिक्षणार्थ्यांची निवड करण्यासाठी शनिवार दि. ३१ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याचा इच्छुक प्रशिक्षणार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ कार्यालय, शिवाजी नगर अमरावती येथे उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन राज्य परिवहन महामंडळाचे विभाग नियंत्रक यानी केले आहे.

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत युवक, युवतींना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांची क्षमता वाढविण्यासाठी या कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थींना शैक्षणिक अहर्तप्रमाणे १२ वी पास प्रशिक्षणार्थींना ६ हजार, आयटीआय/ पदवीका यांना ८ हजार व पदवीधर/पदव्युत्तर यांना १० हजार रुपये शासनाकडून विद्यावेतन दिले जाणार आहे. या कार्य प्रशिक्षणाचा कालावधी ६ महिने असून प्रशिक्षणार्थ्यांचे वयोमर्यादा १८ ते ३५ वयोगटातील असावा.

परिवहन महामंडळामध्ये प्रशिक्षणार्थी लिपीक-टंकलेखक पदाचे ६७ व प्रशिक्षणार्थी लिपीक पदाचे १० जागा, प्रशिक्षणार्थी सहायक पदाचे ६० जागा, प्रशिक्षणार्थी सहायक कारागीरचे १० व प्रशिक्षणार्थी कारागीरचे १० असे १५७ जागेसाठी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. प्रशिक्षणार्थी लिपीक-टंकलेखक व लिपीक पदासाठी पदवीधर, टायपिंग इंग्रजी ४० श.प्र.मि., मराठी ३० श.प्र.मि., एमएस-सीआयटी पात्रता असणे आवश्यक. तर प्रशिक्षणार्थी सहायक, सहायक कारागीर व कारागिरसाठी शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथून १ किंवा २ वर्ष कालावधी असलेला आयटीआय ट्रेड उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

**अर्ज करण्याची पद्धत :** उमेदवाराने त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार www.rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करून रिक्त पदासाठी ऑनलाईन नोंदणी करावी. किंवा प्रत्यक्ष मेळाव्याच्या ठिकाणी उपस्थित राहुन वरील प्रक्रीया करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे रोजगार नोंदणी कार्ड असणे आवश्यक आहे.मेळाव्याच्या ठिकाणी उमेदवारांची राहण्याची, येणे-जाणेसाठी मोफत प्रवास पास दिल्या जाणार नाही. मेळाव्याकरिता उमेदवाराने स्वखर्चाने उपस्थित राहावे. यांत्रिक प्रवर्गातील उमेदवारांना दोन शिफ्टमध्ये कामगिरी करावी लागेल. उमेदवारांना नेमणूक दिलेल्या ठिकाणी कामगिरी करावी लागेल. उमेदवारांना किमान वेतन कायदा, राज्य कामगार विमा कायदा, कामगार भविष्य निर्वाह निधी कायदा, कामगार नुकसान भरपाई कायदा व औद्योगिक विवाद कायदा लागू राहणार नाही. या योजनेंतर्गत शिकाऊ उमेदवारी एनअेपीएस/एमअेपीएस पूर्ण केलेले व करीत असलेले उमेदवार पात्र राहणार नाही, अशी माहिती राज्य परिवहन महामंडळाचे विभाग नियंत्रक यांनी प्रसिद्धी पत्रकाव्दारे दिली

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. २९ ऑगस्ट २०२४

शहर/ग्रामिण




# मतदार यादी निरीक्षक डॉ. निधी पाण्डेय यांची बडनेरा मतदार संघातील मतदान केंद्रांना भेट






**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

मतदार यादी निरीक्षक तथा विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय यांनी व्दितीय भेट कार्यक्रमांतर्गत आज बडनेरा मतदार संघातील मतदान केंद्रांना भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी मतदार नोंदणी व केंद्रांवर असलेल्या सुविधांचा आढावा घेतला.

जिल्हाधिकारी सौरभ कटियार, उप जिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे, डॉ. पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनीचे संचालक तथा नोडल अधिकारी अजय लहाने, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी विजय जाधव, नायब तहसीलदार मधुकर धुळे, विलास वाढोणकर आदी यावेळी उपस्थित होते.यावेळी विभागीय आयुक्तांनी बडनेरा मतदार संघांतर्गत येणाऱ्या वडाळी, यशोदानगर, संजय गांधी नगर परिसरातील लोटस (करण) इंग्लीश प्रि प्रायमरी स्कुल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयातील मतदान केंद्राची पाहणी केली.

भारत निवडणूक आयोगाव्दारे विभागीय आयुक्त डॉ. पाण्डेय यांची 'मतदार यादी निरीक्षक' म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. मतदार यादी निरीक्षकांना १ जुलै २०२४ या अर्हता दिनांकावर आधारित विभागातील सर्व जिल्ह्यांना विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत तीन भेटी करावयाच्या असून, त्यानुसार प्रथम भेट व आढावा बैठका यापूर्वी घेण्यात आल्या आहेत. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार अमरावती विभागातील सर्व जिल्ह्यांकरीता दि. २८ ऑगस्ट व दि. २९ ऑगस्ट रोजी व्दितीय व तृतीय भेटीचा कार्यक्रम निश्चित करण्यात आलेला असून त्यानुसार आज विभागीय आयुक्तांनी मतदानकेंद्रांना भेटी दिल्या. यावेळी त्यांनी मतदार नोंदणी, मतदार याद्या, बडनेरा मतदारसंघातील एकुण पुरुष, महिला, तृतीयपंथी, दिव्यांग, जेष्ठ मतदारांची संख्या याबाबत संबंधितांकडून माहिती घेतली.

दरम्यान, कोणताही पात्र मतदार मतदान यादीत नाव नोंदवावयाचा शिल्लक राहू नये याची सर्वांनी काळजी घ्यावी, असे आवाहन विभागीय आयुक्तांनी केले. भारत निवडणूक आयोगाकडून छायाचित्र मतदार यादीच्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षणाच्या सुधारित कार्यक्रमानुसार ३० ऑगस्ट २०२४ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होणार आहे, असे त्यांनी सांगितले.सुधारित कार्यक्रमानुसार ६ ते २० ऑगस्ट २०२४ या कालावधीत नागरिकांकडून दावे व हरकती मागविण्यात आल्या असून पात्र नागरिकांची नवीन मतदार नोंदणी, दुरुस्ती, वगळणी आदी कामे पूर्ण झाली आहेत. प्राप्त दावे व हरकतींचे २९ ऑगस्ट २०२४ पर्यंत निराकरण करण्यात येणार आहे. मतदार नोंदणी, दुरूस्ती व वगळणी यासाठी दि.१७ व १८ ऑगस्ट २०२४ या दिवशी विशेष संक्षिप्त पुर्नरीक्षण कार्यक्रम राबविला गेला असून या दिवशी प्रत्येक मतदान केंद्रावर मतदान केंद्रस्तरीय अधिकारी मतदार यादीसह उपस्थित होते. आगामी विधानसभा निवडणुकीच्या धर्तीवर अनुषंगीक कामे पूर्ण करण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी श्री. कटियार यांनी यावेळी दिली. निवडणुका पारदर्शक आणि न्याय वातावरणात पार पाडण्यासाठी मतदार याद्यांचे अद्यावतीकरण, शुद्धीकरण महत्त्वपूर्ण असते. त्यासाठी मा.भारत निवडणूक आयोगाकडून विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम राबविण्यात आला आहे. मतदार यादीत कोणत्याही प्रकारची त्रुटी राहणार नाही व एकही पात्र मतदार येत्या निवडणुकांमध्ये मतदानापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देशही विभागीय आयुक्तांनी यावेळी दिले.

# दै. हिंदुस्थानच्या अमृत महोत्सवी वर्षाचा उद्याला शुभारंभ

## केंद्रीयमंत्री नितीन गडकरी, विजय दर्डा, आयएनएस अध्यक्ष राकेश शर्मा, किरण ठाकूर यांची उपस्थिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ अमरावती–**

विदर्भातील अग्रगण्य दैनिक हिंदुस्थान यंदा ७५ वे वर्ष अमृत महोत्सवी वर्ष म्हणून साजरे करीत आहे.

या अमृत महोत्सवी वर्षाचा शुभारंभ शुक्रवारी (ता.३०) केंद्रीय रस्ते वाहतुक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याहस्ते करण्यात येणार आहे.

स्व. सोमेश्वर पुसदकर सभागृह, श्री. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ येथे शुक्रवारी दि. ३० ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणुन माजीराज्यसभा सदस्य व लोकमत वृत्तपत्र समुहाचे अध्यक्ष



विजयबाबू दर्डा, इंडियन न्यूजपेपर सोसायटी, नवी दिल्लीचे अध्यक्ष राकेश शर्मा, लोकमान्य मल्टिस्टेट को ऑप. सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष तथा दै. तरुण भारत बेळगावचे संपादक किरण ठाकूर हे उपस्थित राहतील.

या कार्यक्रमात श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, लेडी गव्हर्नर डॉ. कमलताई गवई यांचा हृदयसत्कार करण्यात येणार आहे. दैनिक हिंदुस्थानच्या अमृतमहोत्सवी वर्षाच्या शुभारंभ कार्यक्रमाला आवर्जुन उपस्थित राहण्याचे आवाहन दैनिक हिंदुस्थान आणि मराठे परिवाराने केले आहे.

# अमरावती जिल्ह्यातील अचलपूर सह ११ जिल्ह्यात सुरू होणार खाजगी एफ. एम. सेवा

## नव्या खाजगी एफ. एम. वाहिन्या सुरू झाल्याने रोजगाराच्या नव्या संधी ही मिळणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती–** खासगी दूरचित्रवाणी वाहिन्यांप्रमाणे खासगी रेडिओ एफएम वाहिन्याही मोठ्या महानगरात लोकप्रिय झाल्या आहेत. या वाहन्यांवरील अनेक कार्यक्रम लोकप्रिय ठरले आहेत. त्याची चर्चाही सर्वदूर होत आहे. या वाहन्यांमध्ये सेवा देणारे आरजे आणि त्यांची कार्यक्रम सादरीकरणाची शैली लोकांच्या पसंतीस उतरली आहे. आता या सेवा छोट्या शहरातही सुरू होत आहे. केद्रीय मंत्रिमंडळाने खासगी एफ. एम. रेडिओ विषयीच्या तिसऱ्या टप्प्यातील धोरणाअंतर्गत २३४ नवीन शहरांमध्ये ही सेवा सुरू करण्याच्या प्रक्रियेला मंजुरी दिली आहे. त्यात महाराष्ट्रातील अकरा शहरांचा समावेश आहे. त्यात विदर्भातील अमरावती जिल्ह्यातील अचलपूर, चंद्रपूर, गोंदिया, यवतमाळ वर्धा या शहरांसह बार्शी, लातूर, मालेगाव, नंदूरबार उस्मानाबाद,उदगीर या



११ शहरांचा समावेश आहे. नव्याने सुरु होणाऱ्या खाजगी एफ. एम. रेडिओ वाहिन्यांमुळे छोट्या शहरांची मागणी पूर्ण होणार आहे. यासोबतच यामुळे त्या त्या प्रदेशातील मातृभाषेमधून नव्या धाटणीची, स्थानिक पातळीवरील आशय निर्मिती देखील होऊ शकणार आहे.या नव्या खाजगी एफ. एम. वाहिन्या सुरू झाल्याने रोजगाराच्या नव्या संधी देखी निर्माण होतील, त्यासोबतच स्थानिक बोली भाषा आणि संस्कृतीला तसेच 'व्होकल फॉर लोकल' उपक्रमालाही चालना मिळू शकणार आहे. बरीचशी शहरे ही आकांक्षीत जिल्ह्यां मधील आहेत. अशा भागांमध्ये या नव्या खाजगी एफ.एम. वाहिन्या सुरू झाल्याने, त्या त्या प्रदेशातील सरकारच्या संपर्काच्या व्याप्तीचा अधिक विस्तार आणि सक्षमीकरण होण्यालाही मदत मिळणार आहे. केंद्रीय मंत्रीमंडळाच्या बैठकीत ७८४.३७ कोटी रुपयांच्या राखीव मुल्यांसह २३४ शहरातील ७३० वाहिन्यांकरिता ई–लिलावाची तिसरी फेरी आयोजित करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.खासगी एफएम वाहिन्यांसाठी वारषिक परवाना शुल्कापोटी वस्तू आणि सेवा कर वगळून एकूण चार टक्के शुल्क म्हणून आकारले जाणार आहे. या उपक्रमाचा फायदा स्थानिक कलावंताना होण्याची शक्यता आहे. त्याच प्रमाणे रोजगार निर्मितीलाही हातभार लागणार आहे. अलीकडच्या काळात मोबाईल फोनमध्येही एफएमची सुविधा असते. ग्रामीण भागात नागरिकांना या सेवेचा फायदा होऊ शकतो. सांस्कृतिक कार्यक्रम, गावातील गप्पा व तत्सम कार्यक्रम तसेच प्रबोधनात्म व शैक्षणिक कार्यक्रमांची रेलचेल या माध्यमातून श्रोत्यांना अनुभवायला मिळू शकते. मोठ्या महानगरात सध्या खासगी एफएम सेवा सुरू असून त्यांना श्रोत्यांची पसंतीही मिळत आहे. ग्रामीण भाग किंवा छोट्या शहरात ही सेवा सुरू झाल्यावर लोकांची सोय होऊ शकते.

# नितीन गडकरींनी मैदानात उतरावं

## विधानसभेसाठी सक्रिय भूमिका बजावावी, आरएसएस आग्रही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८नागपूर –** सध्याची राजकीय स्थिती आणि भाजपसमोर निर्माण झालेलं राजकीय आव्हान बघता केंद्रीय रस्ते आणि महामार्ग मंत्री नितीन




गडकरींनी आता विधानसभा प्रचारात काही अंशी अधिक भूमिका बजावावी अशी आग्रही मागणी केल्याची माहिती आहे. गडकरींचा विकासात्मक आणि तुलनेत मवाळ चेहरा तसंच मंत्री म्हणून केलेल्या कामासंदर्भात राज्यातल्या जनतेच्या मनात त्यांची प्रतिमा पाहता गडकरी हे महाराष्ट्र भाजपच्या मदतीचे ठरतील असं संघाला वाटतंय. दरम्यान या संदर्भात भाजपकडून अजून अंतिम निर्णय झालेला नाही.

केंद्रातल्या मोदी सरकारमधील ज्या काही मोजक्या मंत्र्यानी स्वतःची वेगळी छाप सोडली आहे. नितीन गडकरी जे फक्त स्वतःच्या महाराष्ट्र राज्यापुरतं लोकप्रिय नाहीत, तर ज्यांची लोकप्रियता महाराष्ट्राच्या बाहेर आणि पक्षीय पातळीच्यावर आहे. त्याच नितीन गडकरी यांनी यंदा महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकांच्या अनुषंगाने जास्त सक्रिय भूमिका बजवावी असं संघाला वाटतंय. २०१४ नंतर गडकरी दिल्लीत आणि त्यांनी महाराष्ट्रात लक्ष घालायचे नाही अशी सीमारेषा पक्ष श्रेष्ठींनी घालून दिली होती.

### गडकरी – फडणवीस कॉम्बिनेशन महाराष्ट्रात चालणार?

राजकीय विश्लेषकांना ही विद्यमान राजकीय परिस्थितीत गडकरी यांचं महाराष्ट्रात जास्त सक्रिय भूमिकेत येणं आवश्यक वाटते. राजकीय विश्लेषकांच्या मते गडकरी यांनी २०१९ नंतर त्यांना महाराष्ट्राच्या दैनंदिन राजकारणापासून बाजूला ठेवले असले, तरी त्यांनी कधी ही महाराष्ट्रातील प्रचाराला नकार दिलेलं नाही. शिवाय मतदारांच्या ज्या समूहात भाजपला आजिबात मतदान मिळणार नाही, अशा वर्गात ही गडकरींची प्रतिमा इतर भाजप नेत्यांच्या तुलनेत चांगली आहे. त्यामुळे त्याचा फायदा भाजपला मिळेलच. तर दुसऱ्या बाजूला भाजप पदाधिकाऱ्यांना ही गडकरी महाराष्ट्रात आवश्यक वाटतात. गडकरी सध्या महाराष्ट्राच्या राजकारणात आवश्यक ठिकाणी मार्गदर्शन करतात. मात्र, ते आताच्या तुलनेत जास्त सक्रिय झाले आणि गडकरी – फडणवीस असा कॉम्बिनेशन महाराष्ट्रात राहिला तर भाजपला त्याचा भरीव फायदा मिळेल असं भाजप पदाधिकाऱ्यांना वाटतंय.दरम्यान, संघाने विद्यमान राजकीय परिस्थितीत काय होणं आवश्यक आहे असा त्यांचा निरीक्षण जरी गडकरी आणि भाजपपर्यंत पोहोचवला असला, तरी यासंदर्भात अंतिम निर्णय भाजपलाच घ्यावा लागणार आहे. तसेच केंद्रीय नेतृत्व जोवर तसा सिग्नल देणार नाही, तोवर गडकरी हे ही फारशी सक्रियता दाखवणार नाही असे राजकीय निरीक्षकांना वाटते. त्यामुळे महाराष्ट्राच्या अनुषंगाने भाजप काय रणनीती आखते. आणि त्यामध्ये गडकरींची भूमिका काय असते यावरूनच महाराष्ट्राच्या बाबतीत संघाचा सल्ला भाजपने ऐकलं आहे की नाही हे स्पष्ट होईल.

# चालत्या एस टी बसचा टायर निघाला

## वायगाव ते वलगाव दरम्यानची घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ वलगाव–** धावत्या बसचा टायर भ्रष्ट झाल्याने तो अचानक डिक्सबाहेर निघाला. दरम्यान चालकाच्या प्रसंगावधानाने मोठा अनर्थ टळला. वायगाव ते वलगाव दरम्यान ही घटना बुधवारी (ता.२८) सकाळी ११ वाजताच्या सुमारास घडली. बसमध्ये ५० पेक्षा अधिक प्रवासी होते. अमरावती आगाराची अमरावती ते टाकरखेडा संभू मार्ग रामा ही एमएच ४० वाय ५०१२ क्रमांकाची बस परतीच्या मार्गाने अमरावतीकडे जात होती. या बसमध्ये अन्य प्रवाशांसह सर्वाधिक शाळा, महाविद्यालयाचे विद्यार्थी प्रवास करीत होते. वायगाव ते वलगावदरम्यान धावत्या बसचा समोरील टायर भ्रष्ट झाल्याने तो टायर चाकातुन बाहेर निघाला.बस चालकाने प्रसंगावधन राखून बस नियंत्रणात आणत थांबविली. या दरम्यान बसमधील प्रवाशांचा जिव काही क्षण कासाविस झाला होता. मोठा अनर्थ टळला. या बसमध्ये ५० पेक्षा अधिक प्रवासी असल्याचे बोलले जात आहे. याप्रकरणी विभाग नियंत्रकांनी चौकशीचे आदेश दिले आहेत.

# महानगरपालिका उपायुक्त माधुरी मडावी यांनी केली माताखिडकी परिसरातील नाल्याची पाहणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती–** महानगर पालिका उपायुक्त माधुरी मडावी यांनी आज दिनांक २८ ऑगस्ट,२०२४ रोजी माताखिडकी परिसरातील नाल्याची पाहणी केली. पाहणी दरम्यान सहाय्यक आयुक्त सुभाष जानोरे, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.विशाल काळे, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ.अजय जाधव, उद्यान अधिक्षक श्रीकांत गिरी, अतिक्रमण पथक प्रमुख योगेश कोल्हे, श्याम चावरे, जेष्ठ स्वास्थ निरीक्षक राजेश राठोड, स्वास्थ निरीक्षक, मनपा कर्मचारी उपस्थित होते.

अमरावती महानगर पालिका क्षेत्रातील स्वच्छतेचा दर्जा उंचवावा आणि त्यात अधिकाधिक नागरिकांना सहभागी करून घ्यावे यासाठी बुधवारी सकाळी अमरावती महापालिका क्षेत्रातील माताखिडकी परिसरात विशेष सर्वंकष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत महापालिका उपायुक्त माधुरी मडावी यांनी सहभाग घेतला. माताखिडकी परिसरात सुरू असलेल्या स्वच्छतेची उपायुक्तांनी पाहणी केली. तेथे असलेल्या नागरिकांची संवाद साधून शौचालय, स्वच्छता याबद्दल त्यांची मते जाणून घेतली. माताखिडकी परिसरात जेसीपीद्वारे नाल्याची सफाई करण्यात आली. तसेच नाल्यात तुंबलेला कचरा साफ करण्यात



आला. नाल्यातही अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढीग असल्याने पाणी वाहत नसल्याचे दिसून आले. जेसीबीच्या साहाय्याने कचरा हटवल्यानंतर नाल्यातील पाण्याचा प्रवाह वाढला. इतर नालेही स्वच्छ असावेत : शहरात इतरही अनेक ठिकाणी छोटे–मोठे नाले असून, त्यातही अतिक्रमण आणि अस्वच्छतेची समस्या आहे. मोहिमे दरम्यान माताखिडकी परिसरातील रस्त्याच्या कडेला असलेल्या नाल्याचीही स्वच्छता करण्याचे निर्देश उपायुक्तांनी संबंधीतांना दिले. माताखिडकी नाल्यावरील बिल्डींग मटेरियल रेती गिट्टी रस्त्यावर असल्यामुळे सदर बिल्डींग मटेरियल जप्तीची कार्यवाही महानगर पालिके कडून करण्यात आली. सदर कार्यवाही मनपा उपायुक्त माधुरी मडावी यांच्या उपस्थितीत करण्यात आली. संपूर्ण स्वच्छतेचे हे प्रयत्न यशस्वी होण्या साठी या मोहिमेत सर्वसामान्यांचा सहभाग महत्त्वाचा आहे. यात अमरावतीकरांनी सहभागी होऊन या मोहिमेला लोकचळवळीचे स्वरूप प्राप्त करून द्यावे, असे आवाहन उपायुक्त माधुरी मडावी यांनी केले.

# गुजरातच्या कंपनीकडून बोगस खत विक्री

## पुण्यातील कंपनीच्या संचालकांसह चार विक्रेत्यांवर गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९यवतमाळ :** खरिप हंगामात जिल्ह्यात गुजरातमधील बोगस कृषी उत्पादनांची मोठ्या प्रमाणात विक्री होत असल्याचा प्रकार कृषी विभागाच्या कारवाईतून उघड झाला आहे. सततच्या नापिकीने संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दर्जाहीन बोगस खते विकली जात आहे. यासाठी गुजरातच्या कंपनीने थेट पुण्यात शाखा उघडली. या बोगस खत कंपनीचा भांडाफोड झाल्यानंतर कंपनीच्या संचालकासह खत विक्रेत्या जिल्ह्यातील कृषी केंद्र चालकाविरूद्ध विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

गुजरातमधील रामा फर्टिकेम लि. या कंपनीने १०:२६:२६, डीएपी हे खत निकृष्ट दर्जाचे असल्याचे कृषी विभागाने केलेल्या तपासणीत आढळून आले. या खताचे नमुने प्रयोगशाळेत सदोष निघाले. या खतात आवश्यक घटक नसून ते अप्रमाणित असल्याचे पुढे आले. या गंभीर



प्रकारात कृषी विभागाने दारव्हा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

शेतकऱ्यांना लुबाडणारे रामा फर्टिकेमचे संचालक अभिजित अरविंद नलवडे, शुभम अशोक बानखेडे, सचिन सी. रामसिंघानी, विकास रघुनाथ नलवाडे सर्व रा. पुणे यांचा या बोगस कृषी उत्पादनात समावेश आहे. दारव्हा येथील कृषी केंद्र चालक दिलीप अण्णासाहेब देशकरी यांच्यावर बोगस खत विकल्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कृषी विभागाच्या पथकाला या प्रकारचा संशय आल्यानंतर सागर कृषी केंद्र नेरचे सागर मांगुळकर , किसान एग्रो एजंसीचे सूरज राठोड नेर, आप्पास्वामी एग्रो एजंसीचे शुभम नाईक, आर्णी या सर्व कृषी केंद्रातून खताचे नमुने घेण्यात आले. हे नमुने प्रयोगशाळेत तपासणीला पाठविले असता ते बोगस असल्याचे निष्पन्न झाले. त्यावरून या खतांचा पुरवठा करणाऱ्या रामा फर्टिकेम कंपनीचे संचालक आणि खत विक्री करणारे कृषी केंद्र चालक यांच्यावर दारव्हा उपविभागीय कृषी अधिकारी विजय सरोदे यांनी दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आलाअसून परवाना सुद्धा निलंबित करण्यात आला आहे.

# विक्रम ठाकरे यांच्या नेतृत्वात उद्याला वरुड येथे शेतकऱ्यांचा ट्रॅक्टर मोर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९ अमरावती**

शेतकरी हिताच्या विविध मागण्याकरीता पंचायत समितीचे माजी सभापती विक्रम ठाकरे यांच्या नेतृत्वात शेतकरी आक्रोश ट्रॅक्टर मोर्चा उपविभागीय अधिकारी, मोर्शी कार्यालयावर शुक्रवार ३० ऑगस्ट रोजी वरुड येथून सकाळी १० वाजता निघणार आहे. या मोर्चात शेतकरी, शेतमजूर सहभागी होणार आहे. हा मोर्चा राजुरा नाका वरुड येथून निघणार आहे.संत्रा उत्पादकांना



प्रती हेक्टरी १ लक्ष रुपये मदत जाहीर करावी, सोयाबीन, कापूस, तूर व इतर खरीप पिकांचे अती पावसाने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे वरूड मोर्शी तालुका अतिवृष्टी जाहीर करुन शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी ५० हजार रुपये जाहीर करावी., जानेवारी २०२४ ते मे २०२४ या दरम्यान वरुड, मोर्शी तालुक्यात सर्वत्र गारपीट झाली परंतु शासनाने काही मंडळातच गारपीटः अनुदान जाहीर केले, उर्वरित सर्व मंडळाना गारपीटचे अनुदान सरसकट शेतकऱ्यांना देण्यात यावे.या इतर मागण्यांसाठी शासनाचे लक्ष नेतृत्व वेधणार आहे. मोर्शी व वरुड तालुक्यातील शेतकरी व शेतमजूर बांधवांनी मोठ्या संख्येने या मोर्चामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन विक्रम ठाकरे यांनी केले आहे.

# केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी उद्याला अमरावतीत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९ अमरावती–** केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी हे शुक्रवार, दि. ३० ऑगस्ट रोजी अमरावती जिल्हा दौऱ्यावर येत आहे. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे–



शुक्रवार, दि. ३० ऑगस्ट रोजी सकाळी ११.३० वाजता नागपूर येथून वाहनाने अमरावती येथे आगमन. सकाळी ११.४० वाजता संत अच्च्युत महाराज हार्ट हॉस्पीटल मार्डी रोड, येथे प्रादेशिक ड्रायव्हिंग प्रशिक्षण केंद्राचे उद्धाटन. त्यानंतर नेमाणी गोडाऊन समोरील सिपना कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग टेक्नॉलॉजीच्या रौप्य महोत्सवी सोहळ्यास उपस्थित. दुपारी २.१५ ते ४.३० पर्यत राखीव. दुपारी ५ वाजता हनुमान व्यायाम प्रसारकमंडळाचे सभागृह येथे दैनिक हिन्दुस्थानच्या अमृत महोत्सवी कार्यक्रमास उपस्थित. सायंकाळी ६.३० वाजता अमरावती येथून वाहनाने नागपूरकडे प्रयाण करतील.

# महिला, युवती, विद्यार्थिनींच्या सुरक्षेला प्राधान्य–पीआय आसाराम चोरमले

## चोरमले यांनी स्वीकारला नांदगाव पेठ पो.स्टे.चा पदभारलेडी सिंघम रेखा लोंढे यांची छ.संभाजीनगर येथे बदली

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९नांदगाव पेठ**

देशात आणि राज्यात महिलांवरील वाढत्या अत्याचाराच्या पार्श्वभूमीवर पोलीस विभाग अलर्ट असून महिला, युवती,जेष्ठ नागरिक आणि विद्यार्थिनींच्या सुरक्षेला आपण प्रथम प्राधान्य देणार असल्याचे मत नांदगाव पेठ पोलीस स्टेशनला नव्याने रुजू झालेले पोलीस निरीक्षक आसाराम चोरमले यांनी माध्यम प्रतिनिधींशी बोलतांना व्यक्त केले.नांदगाव पेठ पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षक रेखा लोंढे यांची छ. संभाजीनगर येथे बदली झाल्यामुळे आसाराम चोरमले यांनी मंगळवारी नांदगाव पेठ पोलीस स्टेशनचा पदभार स्वीकारला कायद्याचा सन्मान राखणे हे प्रत्येकाचेच कर्तव्य आहे. आणि हा सन्मान राखणारेच पोलिसांचे खरे मित्र देखील असतात असे देखील ते यावेळी बोलत होते.पोलीस हे जनतेचे



रक्षक आहेत, त्यामुळे नागरिकांनी विशेषतः महिला, युवती व विद्यार्थिनींनी कोणतेही भय न बाळगता स्वतः किंवा आपल्या पालकांसोबत पोलीस स्टेशन गाठून आपली तक्रार नोंदवावी,पोलीस विभाग स्त्री अत्याचाराच्या घटनेबाबत अत्यंत गंभीर असून अश्या प्रकरणात हयगय न करता आपण पोलिसांशी संपर्क साधावा असे आवाहन देखील नवनियुक्त ठाणेदार आसाराम चोरमले यांनी केले. पो.नि.आसाराम चोरमले यांचे नांदगाव पेठ वासीयांच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.यावेळी जेष्ठ पत्रकार राजन देशमुख, मंगेश तायडे,युवासेना जिल्हा सरचिटणीस प्रा. मोरेश्वर इंगळे, अरुण राऊत,सप्तरंग क्रीडा मंडळाचे अध्यक्ष राजेंद्र तुळे, अतुल राऊत,सचिन हटवार,ओम राऊत,यांचेसह मान्यवर मंडळी उपस्थित होते.

# रुग्णांना आरोग्य उपकेंद्रातच मिळतील दर्जेदार सुविधा–आ. यशोमती ठाकूर

## नांदगाव पेठ येथील आरोग्य उपकेंद्राच्या नव्या इमारतीसाठी एक कोटी मंजूर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९नांदगाव पेठ–** गावातील आरोग्य केंद्र हा तेथील गोरगरीब रुग्णांसाठी मोठा आधार असतो, अलीकडे औषधांचा तुटवडा असल्यामुळे रुग्णांना खासगी रुग्णालयात उपचार घ्यावे लागतात मात्र यापुढे गावातील रुग्णांना गावातील उपकेंद्रातच दर्जेदार सुविधा मिळतील अशी ग्वाही आ. यशोमती ठाकूर यांनी दिली. नांदगाव पेठ येथील ॲलोपॅथीक दवाखान्याच्या नव्या इमारतीच्या बांधकामासाठी एक कोटी रुपये मंजूर करून त्याचे भूमीपूजन सोमवारी आ.यशोमती ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले याप्रसंगी त्या बोलत होत्या.

राष्ट्रीय महामार्ग क्र.६ वर असलेल्या नांदगाव पेठ याठिकाणी दिवसेंदिवस होणारे अपघात बघता आरोग्य उपकेंद्राचे विस्तारीकरण करण्यात यावे अशी मागणी काही महिन्यांपूर्वी गावकऱ्यांच्या वतीने आ. यशोमती ठाकूर यांच्याकडे करण्यात आली होती.त्या अनुषंगाने जिल्हा परिषद आरोग्य विभाग अंतर्गत एक कोटी रुपयांचा निधी नव्या इमारतीकरिता तसेच वीस लक्ष रुपयांचा निधी आरोग्य सेविकांच्या निवासस्थानाकरिता मंजूर करण्यात आले होते. सोमवारी दुपारी आ. यशोमती ठाकूर यांच्या हस्ते ॲलोपॅथीक दवाखान्याच्या नव्या इमारतीचे भूमिपूजन तसेच आरोग्य सेविकांच्या निवासस्थानाचे भूमिपूजन उपकेंद्राच्या आवारात करण्यात आले.

यानंतर गोविंदप्रभु संस्थानमध्ये भक्तनिवास बांधकामासाठी १० लक्ष रुपये, जि.प. उर्दू शाळेच्या वर्गखोलीचे बांधकाम करण्यासाठी १३ लक्ष रुपये, श्री श्रीकृष्ण इटनकर ते संगमेश्वर रस्त्याची सुधारणा करण्यासाठी १५ लक्ष रुपये,श्री क्षेत्र संगमेश्वर येथे मुख्य रस्त्यापासून संस्थानकडे जाणाऱ्या पोच मार्गाचे बांधकाम करण्यासाठी १० लक्ष रुपये, जि.प. वर्गखोलीचे बांधकामासाठी १३ लक्ष रुपये मंजूर करून त्यांचेही भूमिपूजन




आ. यशोमती ठाकूर व गावकऱ्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायतच्या वतीने विकासगंगा खेचून आणणाऱ्या आ. यशोमती ठाकूर यांचा सत्कार केला. आपल्या सत्काराला प्रत्युत्तर देतांना त्या म्हणाल्या की,तिवसा विधानसभा मतदार संघातील माझ्यासाठी सर्वात महत्वाचे समजले जाणारे गाव म्हणजे नांदगाव पेठ आहे.संत काशिनाथ महाराजांच्या आशीर्वादाने दरवेळी मला येथून काम करण्याची नवी ऊर्जा व प्रेरणा मिळते त्यामुळे नांदगाव पेठ मधील विकासकामांना मी प्रथम प्राधान्य देते माझ्या मतदार संघातील प्रत्येक गाव आणि तेथील जनता हा माझा परिवार आहे. केवळ निवडून देण्यापूरता त्यांच्याशी माझा संबंध नाही तर प्रत्येकाच्या सुख दुःखात साथ देण्याची माझी जबाबदारी आहे. त्यात नांदगाव पेठशी सुरुवातीपासूनच माझी नाळ जुळलेली आहे. येथील संतांच्या सानिध्यात राहून अनेक विकासकामे करण्याचे भाग्य मला लाभले त्यामुळे भविष्यात देखील यापेक्षा जास्त गतीने विकासकामे करणार असल्याचे आश्वासन सुद्धा आ. यशोमती ठाकूर यांनी उपस्थितांना दिले. या भूमिपूजन कार्यक्रमाला सरपंच कविता विनोद डांगे, उपसरपंच मजहर खा सफदर खा, ग्रामविकास अधिकारी हर्षदा बोंडे, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती हरिष मोरे, अमरावती तालुका अध्यक्ष ग्रामीण काँग्रेस कमेटी ॲड अमित गावंडे, जितु ठाकूर, विनोद डांगे,बाळासाहेब देशमुख, राजेश बोडखे ,गजानन राठोड ,शेलेश काळपांडे, संजय चौधरी,प्रा. मोरेश्वर इंगळे,ज्ञानेश्वर बारस्कर, ग्रा. पं सदस्य वृषाली इंगळे,बाळासाहेब राऊत, भाऊराव कापडे, अनिल कापडे, मोहन शेंदरकर, मनीष दुधे, विपुल पालिवाल, संदीप यावले, नंदू कुकडे,शेख तौफिक, मुकुंद पांढरीकर, वैभव पकडे, मयूर सदावर्ते, चंद्रकांत राऊत, हमीद शहा,मोहम्मद शाकीर यांचेसह गावकरी मंडळी उपस्थित होते.

# नक्षल्यांच्या गडात शिक्षण रुजविणारे मांतय्या बेडके यांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार, अतिशय प्रतिकूल परिस्थिती केला संघर्ष

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९ एटापल्ली गडचिरोली–** एकीकडे मूलभूत सुविधांची वानवा, शिक्षणाचा अभाव आणि दुसरीकडे नक्षलवाद्यांची दहशत अशा अत्यंत प्रतिकूल परिस्थितून वाट काढत एटापल्ली तालुक्यातील जाजावंडी या अतिदुर्गम आदिवासी गावात शिक्षणाचे बीज रोवणारे शिक्षक मांतय्या बेडके यांना यंदाचा राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. राज्यातून केवळ दोन शिक्षकांना हा पुरस्कार घोषित झाला असून ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिनी त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. बेडके यांच्या यशाबद्दल सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.गडचिरोली जिल्हा मुख्यालयापासून ३०० किमी अंतरावरील सिरोंचा तालुक्यातील अतिदुर्गम पातागुडम येथे हे मांतय्या बेडके यांचे मूळ गाव. गावाजवळील अंकिसा येथील श्रीनिवास हायस्कूलमध्ये त्यांनी शिक्षण घेतले. पुढे वर्ध्याला उच्च शिक्षण घेऊन सिरोंचातून 'डीएड' पूर्ण केले. यानंतर त्यांना जाजावंडीच्या प्राथमिक शाळेत २०१० मध्ये नियुक्ती झाली. मूलभूत सुविधाही नसलेल्या गावात शिक्षणाबद्दल प्रचंड अज्ञान होते. तरीही या गावातील विद्यार्थ्यांना उत्तम शिक्षण देण्याचा निर्धार मांतय्या यांनी केला. बहुतांश पालक अशिक्षित असल्याने त्यांना



प्रतिसाद मिळत नव्हता. परंतु मांतय्या यांनी माघार घेतली नाही. त्यांनी गावकऱ्यांशी संवाद सुरू ठेवला. खेळ, कला, नृत्य, शिक्षण याविषयी घरोघरी भेटी देऊन महत्व पटवून देऊ लागले.शिक्षक मांतय्या बोडके यांच्या प्रयत्नानंतर जाजावंड येथील विद्यार्थ्यांमध्ये रुची वाढली. त्याचा सकारात्मक परिणाम पटसंख्येवर झाला. ती वाढू लागली. लोकवर्गणीतून मांतय्या यांनी शाळेच्या इमारतीची दुरुस्ती आणि रंगरंगोटी केली. विद्यार्थ्यांना इंग्रजीचे धडे देणे सुरू केले. आज ही शाळा डिजिटल झाली आहे. त्यांच्या या कार्याची दखल राष्ट्रीय पुरस्काराच्या रूपाने घेण्यात आली आहे. एटापल्ली तालुक्यातील जाजावंडी हे गाव नक्षल कारवायांच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील मानल्या जाते. पण, मांतय्या यांच्या अथक परिश्रमाणे आज या परिसरात शिक्षणाची गंगा वाहू लागली आहे.

## ६३ करोड ६१ लाख रूपयांची पाण्याच्या अमृत योजनेचे थाटात भुमिपुजन

# अमृत २.० योजना म्हणजे रक्षाबंधन निमित्त बहिणींसाठी भेट



### –आमदार प्रताप अडसड यांचे प्रतिपादन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९चांदूर रेल्वे–** चांदूर रेल्वे शहराची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. मात्र आजतागायत तलावाची पाणी क्षमता वाढविण्यासाठी कोणीही प्रयत्न केले नाहीत. पाणीटंचाई असतांना शहरात टँकरद्वारे पाणी वाटप करण्यात आले. ही समस्या लक्षात घेऊन कधीही पाण्याची अडचण पडणार नाही या दृष्टीने अमृत २.० योजना प्रस्तावित केली आणि शासनाने त्याला मान्यता दिली असुन त्याचे भूमिपूजन आता झाले आणि ते कामही आज – उद्यापासून सुरू होऊन जाईल. ही आता कायमस्वरूपी पाण्याची व्यवस्था चांदूर रेल्वे शहरवासीयांकरीता असुन रक्षाबंधन निमित्त बहिणींसाठी ही माझी भेट आहे. निवडणुकीच्यावेळी काही आश्वासने दिली होती व ती पूर्ण करण्याची संधी मिळाली आणि त्या माध्यमातून संपूर्ण मतदारसंघात हजारो कोटी रुपयांचा निधी आणलेला आहे असे मत आमदार प्रताप अडसड यांनी व्यक्त केले. ते



६३ करोड ६१ लाख रूपयांच्या अमृत योजनेच्या भुमिपुजन प्रसंगी बुधवारी (ता. २८) बोलत होते. भुमिपुजनानंतर आयोजित रक्षाबंधन कार्यक्रमात आ. प्रताप अडसड यांना हजारो बहिणींनी राख्या बांधल्या.

चांदूर रेल्वे शहरात पाण्याची समस्या पाहता आमदार प्रताप अडसड यांच्या प्रयत्नाने ६३ करोड ६१ लाख रूपयांची अमृत योजना मंजुर झाली आहे. या योजनेत लोअर वर्धा डॅम्प (वरुड बगाजी) येथे जॅकवेल, पम्पींग स्टेशन व सोलर प्लॉन्ट तसेच लोअर वर्धा डॅम्प वरुड बगाजी ते चांदूर रेल्वे पर्यंत पाईप लाईन, चांदूर रेल्वे येथे नविन जलशुद्धीकरण केंद्र, नविन दोन पाण्याच्या टाक्या तयार करण्यात येणार आहे. यात ६ लक्ष लिटरची टाकी हुतात्मा स्मारक येथे तर दुसरी टाकी ७.५ लक्ष लिटरची जुना सरकारी दवाखाण्याजवळ येथे होणार आहे. याशिवाय चांदूर रेल्वे शहरामध्ये अंतर्गत नविन पाण्याची वितरण व्यवस्था व नविन नळ जोडणी सुध्दा होणार आहे. या योजनेचा भूमिपूजन सोहळा बुधवारी हुतात्मा स्मारक येथे आ. प्रताप अडसड यांच्या शुभहस्ते पार पडला. या सोहळ्यानंतर सामुहीक रक्षाबंधन कार्यक्रमाचेही आयोजन यादव मंगल कार्यालयात केले होते. या कार्यक्रमाला हजारो बहिणी उपस्थिती होत्या. सदर कार्यक्रमाला भाजपा नेते राबसाहेब रोठे, अर्चना रोठे (अडसड), तालुकाध्यक्ष बबनराव गावंडे, शहराध्यक्ष बंडू भुते, सुमेरचंद जैन, जुगलकिशोर राठी, सुनिल जावरकर, विक्की बुधलानी, प्रविण खैरकार, अंकित पोळ, अमोल इंगोले (धामक), प्रशांत भेंडे, अजय हजारे, विलास तांडेकर, तेजस वाट, रवींद्र उपाध्याय, बच्चू वानरे, अमोल वानखडे, संदीप सोळंके, मनोज जयस्वाल, बाळासाहेब सोरगिवकर, डॉ. वसंत खंडार, राजेश चौधरी, अनिल मोटवानी, स्वाती मेटे, सुरेखा तांडेकर, डॉ. सुषमा खंडार, वंदना हजारे, सविता ठाकरे, अपर्णा जगताप, नंदा माने, देविका राठोड, विजय मिसाळ, नंदा वाधवानी, वैभव गायकवाड, मंगेश भोसले, सचिन होले, नितीन हंबर्डे, ॲड. भोयर, जगदिश कथलकर, समिर भेंडे, रोशन सरदार, अक्षय गडलिंग, किरण मेश्राम यांसह चांदूर रेल्वे तालुक्षातील भारतीय जनता पार्टी, भारतीय जनता युवा मोर्चा, शहरवासी उपस्थित होते.

# हिंदुस्थान अमृत महोत्सव

७५
१९५०-२०२४

## शुभआरंभ

वेळ

**शुक्रवार, ३० ऑगस्ट २०२४, सायं. ५ वाजता**

स्थळ

**स्व. सोमेश्वर पुसदकर सभागृह**
**ह. व्या. प्र. मंडळ परिसर, अमरावती**

शुभहस्ते

प्रमुख अतिथी



**मा. ना. श्री नितीनजी गडकरी**
मंत्री, रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय, भारत सरकार



**मा. श्री विजयबाबू दर्डा**
राज्यसभा सदस्य (१९९८-२०१६)
अध्यक्ष, लोकमत वृत्तपत्र समूह



**मा. श्री राकेशजी शर्मा**
अध्यक्ष, इंडियन न्यूजपेपर सोसायटी, नवी दिल्ली



**मा. श्री किरणजी ठाकूर**
संस्थापक अध्यक्ष, लोकमान्य मल्टिस्टेट को-ऑप. सोसायटी तथा संपादक, दै. तरूण भारत, बेळगाव

सत्कारमूर्ती



**पद्मश्री मा. प्रभाकररावजी वैद्य**




**मा. डॉ. श्रीमती कमलताई गवई**

## विनीत : दै. हिंदुस्थान आणि मराठे परिवार

**शुभेच्छुक - सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक**

# उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींचा समृद्धी महामार्गावरून प्रवास, अधिकाऱ्यांच्या दाव्याची पोलखोल

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२९मुंबई



नागपूर समृद्धी महामार्गावर अपघात रोखण्यासाठी वाहनांची नियमित तपासणी होत असल्याचा दावा महाराष्ट्र राज्य रस्ते विकास प्राधिकरण (एमएसआरडीसी) आणि परिवहन विभागाचे अधिकारी करतात. हाच दावा त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात एका जनहित याचिकेवर सुनावणीदरम्यान केला. मात्र न्यायमूर्ती यांनी स्वत:च्या प्रवासाचे उदाहरण देत अधिकाऱ्यांचा दावा फेटाळला आणि खोटे बोलल्याबाबत कानउघाडणी केली.

न्यायालयाने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास प्राधिकरण (एमएसआरडीसी)च्या अधिकाऱ्यांना फटकारले. नियमित तपासणीबाबत केलेल्या दाव्याबाबत एका दिवसात संपूर्ण आकडेवारीसह मूळ कागदपत्रे सादर करण्याचे निर्देश न्यायालयाने एमएसआरडीसी आणि नागपूर परिवहन विभागाला दिले. समृद्धी महामार्गावरील जीवघेणे अपघात व अपुऱ्या सुरक्षा उपाययोजनांच्या मुद्यावर उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. या याचिकेवर न्या. नितीन सांबरे आणि न्या. अभय मंत्री यांच्या खंडपीठासमक्ष सुनावणी झाली. सुनावणीदरम्यान एमएसआरडीसीचे कार्यकारी अभियंता यांनी न्यायालयात शपथपत्राद्वारे सांगितले की, समृद्धी महामार्गावर प्रवेश करणाऱ्या प्रत्येक वाहनाच्या टायरसह इतर तपासण्या केल्या जातात. ही तपासणी नियमित होत असल्याचा दावा अधिकाऱ्यांनी केला.

मात्र न्या. नितीन सांबरे यांनी स्वत:चे अनुभव कथन करत सांगितले की, आम्ही केवळ तपासणीबाबत ऐकले आहे, कधी तपासणी होताना बघितले नाही. समृद्धी महामार्गावर जर नियमित तपासणी होत असेल तर कुठे होत आहे, आजवर किती वाहनांची तपासणी केली, असे अनेक सवाल न्यायालयाने उपस्थित केले. सुनावणीदरम्यान उपस्थित कार्यकारी अभियंता याबाबत समाधानकारक उत्तर देऊ न शकल्याने न्यायालयाने त्यांची कानउघाडणी केली आणि तात्काळ नागपूर परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांना न्यायालयात उपस्थित राहण्याचे निर्देश दिले. परिवहन विभागाचे अधिकारी आल्यावर अधिकाऱ्यांना न्यायालयाने तंबी दिली आणि एका दिवसात तपासणीबाबत समाधानकारक माहिती सादर न केल्यास कारवाईचा इशारा दिला. न्यायालयाशी खेळण्याचा प्रयत्न कराल तर तुम्हाला कसे हाताळायचे हे आम्हाला चांगलेच ठाऊक आहे. ज्या जनतेच्या पैशातून तुम्ही पगार घेता, त्याच जनतेच्याबाबत तुम्ही असे वागता, अशा कठोर शब्दात न्यायालयाने अधिकाऱ्यांना खडेबोल सुनावले. गुरुवार दुपारपर्यंत संपूर्ण आकडेवारी सादर करा, असे आदेश न्यायालयाने एमएसआरडीसी आणि नागपूर परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले.

## बोगस खतविक्री अंगलट : एसएओंची कारवाई

# आठ कृषी सेवा केंद्रांचे खत परवाने निलंबित

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२९ अमरावती



रासायनिक खतविक्रीमध्ये अनियमितता केल्याप्रकरणी आठ कृषी केंद्रांचे खत परवाने वर्षभरासाठी निलंबित करण्यात आले. ही कारवाई जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी तथा परवाना अधिकारी राहुल सातपुते यांनी बुधवारी केली, यापूर्वी मुख्य वितरकाचा परवाना कायमस्वरूपी रद्द करण्यात आला आहे, तर पाच कृषी केंद्र चालकांना ताकीद देण्यात आली आहे.


जिल्ह्यात रासायनिक खतांऐवजी ५० लाखांची माती विकण्याचा भंडाफोड कृषी विभागाने केला होता. संबंधित रामा फर्टिकेम खत कंपनीकडे आयएफएमएस प्रणालीवर आयडी क्रमांक नसतानासुद्धा मंदार ॲग्रो सर्व्हिसेस या मुख्य वितरकाद्वारा सहातालुक्यांतील १२ किरकोळ विक्रेत्यांना खतांची विक्री करण्यात आली. त्यामुळे एसएओ राहुल सातपुते यांनी या विक्रेत्याचा खत परवाना यापूर्वी कायमस्वरूपी रद्द केला आहे.या खताची पॉस मशीनशिवाय विक्री करणाऱ्या १२ कृषी केंद्रांना नोटीस बजावण्यात आली होती. सुनावणीदरम्यान रामा फर्टिकेम या कंपनीचे खत 'ओ' फार्म परवान्यात समाविष्ट नाही व या खताची विक्री संबंधित कृषी केंद्रातून पॉस मशीनशिवाय झाल्याचे स्पष्ट झाले. दरम्यान, शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याने खताची रक्कम पाच केंद्र चालकांनी परत केली. त्यामुळे या केंद्रांना ताकीद देण्यात आली, तर अन्य आठ केंद्रांचे परवाने वर्षभरासाठी निलंबित करण्यात आले आहेत.

### या केंद्रांचे परवाने निलंबित

तिवसा तालुक्यात नीलेश कृषी केंद्र (मारडा), भामकर कृषी केंद्र (शिवणगाव), गणेश कृषी केंद्र (तिवसा), सावरकर कृषी केंद्र (तिवसा), याशिवाय खंडेश्वर कृषी केंद्र (नांदगाव खं), शुभम कृषी केंद्र (मंगरूळ च.), अमोल कृषी केंद्र (रिद्धपूर) व राऊत कृषी केंद्र (चांदूर रेल्वे) या केंद्रांचा खत विक्री परवाना १२ महिन्यांसाठी निलंबित करण्यात आला.

# अंजनगाव नगरपालिकेत 'कुदो' आंदोलन

## नगर परिषद प्रशासनाची उडाली तारांबळ





विदर्भ प्रजासत्ताक
दि.२९ अंजनगाव सुर्जी

शहरातील प्रभाग क्र.११ मधील महादेव मंदिर ते नवाब हॉल रस्ता दुरुस्तीच्या मागणीसाठी काँग्रेसचे कार्यकर्ते बुधवारी नगपरिषद इमारतीवर चढले. तेथून ते उड्या घेण्याच्या तयारीत असल्याचे निदर्शनास येताच नगर परिषद प्रशासनाची तारांबळ उडाली.

शहरातील नवगज्जी प्लॉटमधील जुना डांबरी रस्ता उखडल्याने नागरिकांना तसेच शालेय विद्यार्थ्यांना प्रचंड त्रास होतो. तत्काळ रस्ता न झाल्यास स्थानिक नागरिक व काँग्रेसचे तेजस अभ्यंकर यांनी नगरपरिषद इमारतीवर चढून रूढी मारण्याचाइशारा दिला होता. २७ ऑगस्टला मुख्याधिकाऱ्यांशी झालेल्या चर्चेतून काहीही निष्पन्न न झाल्याने अखेर त्यांच्यासह आंदोलनकर्ते बुधवारी इमारतीवर चढले. त्यानंतर तहसीलदार पुष्पा सोळंके आणि मुख्याधिकारी दादाराव डोल्हारकर यांनी आंदोलनकर्त्यांशी चर्चा करून १५ दिवसांच्या आत कामाचे अंदाजपत्रक शासकीय मंजुरीकरिता पाठविण्यात येईल, असे लेखी आश्वासन दिले.

आंदोलनात सोमेश इंगळे, रियाज खान, कादरशाहा अहमदशहा, मो. आबीद शेख मेहबूब, शाहरुख खान शाबीर खान, समीर खान जबीर खान, शोएबअली शाएब अली, फयुम बेग मिर्झा बेग, शब्बीर शहा वजीर शहा, सालीक अन्सारी अब्दुल सत्तार, शेख अलीम शेख उपस्थित होते. आंदोलनाची सूचना पोलिसांनाही होती. त्यामुळे नगर परिषदेमध्ये बंदोबस्त होता. इमारतीमागून चढायला रस्ता नसल्याने पोलिसांनी तिकडे बंदोबस्त ठेवला नाही. तथापि, आंदोलकांनी त्या मार्गाने इमारतीवर चढले.

# ३७५ हेक्टर क्षेत्र बाधित ३२ लाखांची मागणी

## जिल्हाधिकाऱ्यांचा प्रस्ताव : जून-जुलैतील पावसाचे नुकसान

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२९ अमरावती



यंदा जून व जुलै महिन्यांत अतिवृष्टीमुळे सहा तालुक्यांत ७६५ शेतकऱ्यांच्या ३७५ हेक्टरमधील पिकांचे ३३ टक्क्यांवर नुकसान झाले आहे. यासाठी 'एनडीआरएफ'च्या निकषाप्रमाणे ३२.२८ लाखांच्या निधीची मागणी जिल्हाधिकारी यांनीशासनाकडे केली.

यंदा मान्सून वेळेवर आला तरी त्याची वाटचाल मंदावल्याने पेरण्यांना उशीर झाला. त्यानंतर जूनअखेर ते जुलै महिन्यात पावसाची रिपरिप सुरू होती. या कालावधीत २३ महसूल मंडळांमध्ये अतिवृष्टी झाल्याने पेरणी झालेल्या पिकांचे नुकसान झाले, शिवाय शेतात पाणी साचून पिके बाद झाली.

नदी-नाल्यांना पूर आल्याने काठालगतच्या शेतातील पिके खरडून गेल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी या प्रकरणी पंचनाम्याचे आदेश दिले होते. कृषी व महसूल विभागाच्या संयुक्त पाहणीनंतर सहा तालुक्यांतील ३७५ हेक्टरमधील सोयाबीन, तूर, कपाशी, ज्वारी व मका पिकांचे ३३ टक्क्यांवर नुकसान झाल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्याच्या मदतीसाठी८५०० रुपये प्रतिहेक्टरप्रमाणे ३२,२८,५५० रुपये मागणीचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांनी विभागीय आयुक्तांमार्फत शासनाला पाठविला आहे.

# संत श्री गुलाबराव महाराज भक्तिधाम येथे अखंड नामजप सप्ताहाचा समारोप

दि.२९ विदर्भ प्रजासत्ताक
चांदुर बाजार



संत श्री गुलाबराव महाराज सेवा संस्था, बोराला भक्तिधाम, चांदूरबाजार येथे जन्माष्टमी निमित्त आयोजित अखंड नामजप सप्ताहाचा समारोप २७ ऑगस्ट २०२४ रोजी विविध कार्यक्रमांनी संपन्न झाला. सकाळी भजनी काल्याचे आयोजन करण्यात आले होते, संस्थेचे संरक्षक सदस्य मां. डॉ. श्री अरविंद देशमुख यांचे प्रवचन पार पडले.कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी संस्थेचे संस्थापक, वै. श्रद्धेय नानाजी इंगोले यांनी वारीकरी शिक्षणासाठी स्थापन केलेल्या गुरुकुलात विद्यार्थ्यांसाठी सुविधा उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने श्री विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. श्री राजाभाऊ नानासाहेब इंगोले आणि मां. डॉ. श्री प्रदीपराव इंगोले यांनी संस्थेला २ लाख रुपयांचा धनादेश सुपूर्द केला.संस्थेचे सदस्य व माजी प्राचार्य श्री भास्करराव मोहोड लिखित महाराजांच्या धर्मपत्नी वज्रचुडा मंणकर्निका आई या हिंदी पुस्तकाचे विमोचन संपन्न झाले. तसेच संस्थेचे अध्यक्ष श्री रवींद्र बाबुराव इंगोले यांच्या ५७ व्या वाढदिवसानिमित्त कार्यकारिणी सदस्यांनी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमात ह. भ. प. श्री रमेश महाराज काळे, सौ. नैनाताई कडू, डॉ. अरविंद देशमुख, ॲड. राजाभाऊ इंगोले, डॉ. प्रदीप इंगोले आणि जगदीश इंगोले यांचे मनोगत व्यक्त झाले. अध्यक्षीय भाषण संस्थेचे अध्यक्ष श्री रवींद्र इंगोले यांनी केले, तर संचालन अनुराधा इंगोले यांनी केले. कार्यक्रमाची सांगता आरती व प्रसाद वितरणाने करण्यात आली.या कार्यक्रमास विविध मान्यवरांची उपस्थिती होती, ज्यात पुस्तकाचे लेखक श्री भास्करराव मोहोड, मां. डॉ. सौ. नैनाताई कडू, सन्माननीय संरक्षक डॉ. अरविंद देशमुख, संस्थेचे सदस्य ह. भ. प. श्री रमेश महाराज काळे, तसेच अन्य प्रतिष्ठित सदस्य आणि पाहुणे यांचा समावेश होता.

# मोबाईलमुक्त विद्यार्थी घडवीणारे शिक्षक सुधीर केने आकाशवाणीवर

## १ सप्टेंबरला लोकजागर या कार्यक्रमात होणार प्रसारण; नाविण्यपूर्ण उपक्रमाची देणार माहिती

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२९अमरावती



चांदुर रेल्वे तालुक्यातील मालखेड रेल्वे येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यालयातील आदर्श तथा अष्टपैलू व्यक्तिमत्व असलेले उपक्रमशील शिक्षक सुधीर पंजाबराव केने अमरावती आकाशवाणी वर श्रोत्यांना ऐकायला मिळणार आहे.सुधीर केने यांची मुलाखत १ सप्टेंबरला आकाशवाणी च्या लोकजागर या सदरात सकाळी १०.०० वाजता प्रसारित केली जाणार आहे.या कार्यक्रमात ते मोबाईलमुक्त विद्यार्थी या नाविण्यपूर्ण उपक्रमाबाबत माहिती देणार असून शाळा, विद्यार्थी आणि पालक यांच्या सहभागातून हा उपक्रम कसा यशस्वी झाला तसेच मोबाईल चे विद्यार्थी जीवनावर होणारे दुष्परिणाम याविषयी देखील ते मार्गदर्शन करणार आहेत.सुधीर केने यांनी भुलाबाई ची मुखोदगत गाणी पुस्तक रुपात आणली आहे विशेष म्हणजे या पुस्तकाचा गौरव माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांनी केला आहे.तसेच या पुस्तकाचे प्रकाशन विधानभवनात तत्कालीन शिक्षनमंत्री प्रा. वसंत पुरके यांच्या हस्ते करण्यात आले होते. या पुस्तकाबरोबरच सुधीर केने यांनी इतरही काही पुस्तके लिहिली आहेत.

# 'मनसे'च्या विदर्भस्तरीय दहीहंडीत ६ गोविंदा पथकांमध्ये रंगली चुरस; हिंदवी पाटीलने आणली बहार; तरुणाई तालावर थिरकली

विदर्भ प्रजासत्ताक दि.२९अमरावती



महाराष्ट्र नवनिर्माण सेनेद्वारे संत गाडगेबाबा समाधी मंदिरापुढील मैदानात बुधवार २८ रोजी - रात्री आयोजित विदर्भस्तरीय दहीहंडी स्पर्धेत ११ मंडळांनी प्रवेश नोंदवला. त्यापैकी ६ गोविंदा पथकांमध्ये प्रत्यक्ष दहीहंडी फोडण्यासाठी चुरस रंगली. दहीहंडीची आधी ४५ फूट उंची ठेवण्यात आली होती. यासाठी १लाखाचा पुरस्कार होता. परंतु, या उंचीसाठी गोविंदा पथक तयार नसल्याने उंची २८ फुटापर्यंत कमी करण्यात आली.

लावणी सम्राज्ञी हिंदवी पाटीलचे विविध - गीतांवरील नृत्य दहीहंडीचे आकर्षण ठरले. अप्सरा आली.., गुलाबी साडी.., बाण नजरेचा लागे उरी.. अशा एकाहून एक गीत व लावणी गीतांवर तिने नृत्य करून उपस्थितांनाही थिरकायला लावले.हिंद केसरी, अमरावती, वीर भगतसिंग, करजगाव, कालभैरव, शिवतांडव, चांदूर बाजार, फ्रेंड्स ग्रुप, धामण रेल्वे, ब्रदर्स पथक, अमरावती, छत्रपती पथक, आदर्श पथक, धामणगाव रेल्वे, बाल साईनाथ पथक, अमरावती, जय श्री कृष्ण मंडळ, अमरावती या गोविंदा पथकांनी प्रवेश नोंदवला. मात्र, यापैकी ६ पथकंच दहीहंडीसाठी उपस्थित राहिले.

दोन हजार प्रेक्षकांनी दहीहंडी बघितली. याप्रसंगी मनसे पदाधिकारी पप्पू पाटील, मनसे शहर अध्यक्ष धीरज तायडे, प्रवीण डांगे, बबलू आठवले, पंकज तायडे, वैभव घोटे, रोशन शिर्के व इतर उपस्थित होते.

# क्रीडा दिनाचे औचित्य साधत पाण्यावर तरंगत केली योगासने



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ अमरावती**

हॉकीचे महान जादुगर मेजर ध्यानचंद यांची जयंती २९ ऑगस्ट निमीत्त देशात राष्ट्रीय क्रिडा दिवस मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.याच क्रीडा दिनाचे औचित्य साधत अमरावती शहर पोलिस आयुक्तलयातील पोलीस अंमलदार प्रविण आखरे यांनी जलतरण केंद्रात पाण्यावर तरंगत विविध प्रकारचे योगासने केलीत प्रवीण आखरे हे जलतरण केंद्रात पोलिस अंमलदार म्हणून काम पाहत आहे.त्यांनी या पाण्यावर तरंगत व पाण्याच्या आत राहून योगासने करून 'इंडीया बुक ऑफ रेकॉर्ड' व 'एशिया बुक ऑफ रेकॉर्ड' आपल्या नावे केला आहे.त्यांच्या या कामगीरीमूळे अमरावती शहर पोलिस विभागाच्या शिरपेचात मानाचा तूरा रोवला गेला असून महाराष्ट्र राज्य पोलीस दलाची शान वाढली आहेप्रवीण यांनी पूर व नियंत्रण तसेच शोध व बचावपथकांमध्ये काम केलेले असून त्यादरम्यान आतापर्यंत ७८ मृतदेह पूराच्या पाण्याच्या बाहेर काढले आणि एकूण ५५ लोकांचे प्राण वाचविले आहेत.प्रवीण यांनी आज क्रीडा दिनानिमित्त पाण्यावर तरंगतसुप्त पवनमुक्तासन, भुजंगासन, पश्चिमोत्तानासन, वज्रासन,धनुरासन, मत्स्यासन, पादहस्तासन, सर्वांगासन ही आसने केलीत.

# अमरावतीत महिला-विद्यार्थी सुरक्षा व सायबर गुन्हे जागरूकता कार्यशाळा

## शैक्षणिक संस्थाचालक, प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षकांचा सहभाग



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ अमरावती**

राज्यातील वाढत्या महिला अत्याचाराच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर अमरावती पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांच्या पुढाकारातून अमरावतीत महिला विद्यार्थी सुरक्षा उपाययोजना व सायबर गुन्हे जागरूकता कार्यशाळा घेण्यात आलीय.. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भावनात ही कार्यशाळा घेण्यात आली. महिला विद्यार्थी यांच्या सुरक्षेसाठी असणाऱ्या कायद्या संदर्भातील जनजागृती, सायबर सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक असलेली खबरदारी यासह विविध प्रकारची जनजागृती कार्यशाळे दरम्यान पोलिसांनी केली.. जिल्हाधिकारी सौरभ कटियार, सीईओ संजीता मोहापात्रा,पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी ,ग्रामीण पोलीस अधीक्षक विशाल आनंद मनपा आयुक्त सचिन कलंत्री,पोलीस उपयुक्त गणेश शिंदे ,श्रीमती उज्वला पवार प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्यासह पोलीस विभागाचे अधिकारी ,शिक्षण विभागाचे अधिकारी व संस्थाचालक या कार्यशाळेला उपस्थित होते.

यावेळी रस्ता सुरक्षा, गुन्हे प्रतिबंध, लहान मुले व महिलांवर होणारे अत्याचार, पोलिस कायदे याबाबत सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.शालेय विद्यार्थिनींना ऑनलाइन फसवणूक, सोशल मीडिया या संदर्भात फेसबुक, व्हॉटसॲप, इंस्टाग्राम, टिकटॉक या ॲप्लिकेशनचा वापर करताना काय खबरदारी घ्यावी याबाबत मार्गदर्शन तसेच पोलिस आयुक्तालयाकडून महिला, मुलींच्या सुरक्षिततेसाठी असलेल्या दामिनी पथक, पोलिस दिदी पथक, लेडिज पेट्रोलिंग पथक याबाबत सविस्तर माहिती दिली. फेसबुक, इमेल अकाऊंट व सोशल ॲप्लिकेशनचा पासवर्ड कशा प्रकारचा असावा जेणेकरून अज्ञात व्यक्ती हॅक करणार नाही याबाबत माहिती देण्यात आली.

# १ सप्टेंबर रोजी महाविद्यालयीन कर्मचारी कृतज्ञता सन्मान सोहळा

## २५ पेक्षाअधिक सेवानिवृत्ती पदाधिकारी, कर्मचारी होणार सन्मानित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि २९ अमरावती**




संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ परिक्षेत्रिय महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी संघटनेच्या वतीने रविवार १ सप्टेंबर रोजी कृतज्ञता व सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या समारंभामध्ये २५ पेक्षा जास्त सेवानिवृत्त कर्मचारी व संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात येणार आहे.महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी संघटनेमध्ये विशेष योगदान देऊन काही कर्मचारी सेवेतून निवृत्त झालेले आहे. त्यांचे समर्पण आणि परिश्रम कौतुकास्पद आहे. अनेक वर्ष सेवेत घालवल्यानंतर त्यांचा यथोचित सन्मान व्हावा म्हणून अमरावती जिल्हा महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी संघटनेच्या वतीने श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय अमरावती येथे रविवार १ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता हा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला आहे. प्राचार्य डॉ. वर्षा देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित या कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून माजी पालकमंत्री आ. यशोमती ठाकूर यांची उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून अमरावती पदवीधर मतदार संघाचे आ. धीरज लिंगाडे उपस्थित राहतील. कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. अंबादास कुलट,प्राचार्य डॉ. विजय दरणे यांची प्रमुख उपस्थिती राहील.अमरावती जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातून गेल्या वर्षभरापूर्वी सेवानिवृत्त झालेले कर्मचारी तसेच संघटनेसाठी ज्यांनी विशेष योगदान दिले असे सेवानिवृत्त कर्मचारी व पदाधिकारी या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण राहणार आहे. सर्वच सेवानिवृत्त कर्मचारी व पदाधिकाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह, शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात येणार आहे. संघटनेच्या वतीने पहिल्यांदाच होत असलेल्या या आगळ्यावेगळ्या कार्यक्रमाला महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष प्रशांत देशमुख व सचिव प्रफुल्ल घवळे यांनी केले आहे.

# राष्ट्रवादीची जनसंवाद यात्रा १ सप्टेंबर रोजी वरूडात

## उपमुख्यमंत्री अजितदादा पवार सह अन्य मंत्र्यांची राहणार उपस्थिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ वरुड**



वरुड शहरात राष्ट्रवादी काँग्रेस जनसंवाद यात्रा व भूमिपूजन समारंभाचे आयोजन १ सप्टेंबर रोजी करण्यात आले असून यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचेसह अनेक मंत्री महोदय उपस्थित राहणार आहे.रविवार दि १ सप्टेंबरला शहरात राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने जनसंवाद यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.

या यात्रेला संबोधित करण्यासाठी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, अन्न पुरवठा मंत्री छगन भुजबळ, सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील, वैद्यकीय मंत्री हसण मुश्रीफ, अन्न व औषध प्रशासन धर्मवबाबा आत्राम, पुनर्वसन मंत्री अनिल पाटील, कृषी मंत्री धनंजय मुंडे, क्रीडामंत्री संजय बनसोडे, महिला बाल कल्याण मंत्री अदिती तटकरे, विधान परिषद सदस्य अमोल मिटकरी, विधिमंडळ समन्वयक संजय खोडके, जिल्हाध्यक्ष संतोष महात्मे, राज्य उपाध्यक्ष वसंतराव घुईखेडकर, राज्य समन्वयक सुरेखा ठाकरे यांची उपस्थिती राहणार आहे. यावेळी उपजिल्हा रुग्णालयाची पाहणी तथा महिला बाल रुग्णालयाचे भूमिपूजन करण्यात येणार आहे.






# संत्रा उत्पादक शेतकरी व तिवसा तालुका काँग्रेस आक्रमक

## तिवसा तहसील कार्यालय येथे ठिय्या आंदोलन : तहसीलदारांना फळगड झालेली संत्री दिली भेट





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ तिवसा**

तिवसा तालुक्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना गेल्या दोन महिन्यापासून सततच्या पावसाने तथा वादळी वाऱ्याने संत्रा ऐन काढणीच्या अवस्थेत असताना सरासरीपेक्षा तालुक्यात जास्त पाऊस झाल्यामुळे, मोठ्या प्रमाणात संत्रा फळ गळून पडत आहे.महायुती सरकारने कपाशी तूर सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या शेतमालाला समाधानकारक भाव दिला नसल्यामुळे यापूर्वी शेतकरी आधीच हवालदिल आहे.संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना उत्पादन शुल्क खर्च, खते बी बियाणे कीटकनाशके त्यावर असलेली जीएसटी यात असल्याचे कंबरडे मोडले आहे.जिल्ह्यातील मोर्शी वरूड,वर्धा जिल्ह्यातील आष्टी आर्वी या भागात महसूल विभाग व कृषी विभागामार्फत सर्वेक्षण करेल याची माहिती सुद्धा उपलब्ध आहे. परंतु तालुक्यातील शेतकऱ्यांच्या संत्रा फळगळ बाबतच्या संकटाचा सर्वेक्षण, त्यावर आलेल्या रोगाबाबत मार्गदर्शन करण्यास कृषी विभाग असमर्थ दिसतोय. सरकारच्या कृषी व फलोत्पादन मंत्रालया विभागामार्फत महायुती सरकारमधील मंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या या संकटाकडे तातडीने लक्ष देऊन तातडीने संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या झालेला नुकसानीचे सर्वेक्षण करून पंचनामे कडून रुपये तीन लक्ष हेक्टरी मदत प्रदान करण्याची मागणी तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना तहसीलदार तिवसा मार्फत निवेदनातून करण्यात आली. तालुक्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या नुकसानीचे सर्वेक्षण न झाल्यास त्यांना नुकसान भरपाई न मिळाल्यास सात दिवसांनी राष्ट्रीय महामार्गावर चक्काजाम आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.यावेळी तालुका काँग्रेस कमिटीचे कार्यकारी अध्यक्ष वैभव वानखडे, माजी जि प सभापती दिलीपराव काळबांडे, खरेदी-विक्रीचे अध्यक्ष सुरेशराव मेटकर, खरेदी विक्री संचालक गजानन अळसपुरे, माजी बाजार समिती संचालक दिनेश साव, शहर काँग्रेस अध्यक्ष सेतू देशमुख, कार्यकारी शहराध्यक्ष सुनील बाखडे, गटनेते किसन मुंदाने, युवक काँग्रेसचे महासचिव रितेश पांडव, माजी नगरसेवक नरेंद्र विघ्ने, मोहनराव वानखडे, प्रमोदराव वानखडे, अतुलभाऊ देशमुख, पं स सदस्य शरद वानखडे, खरेदी विक्री संचालक दिलिप वानखडे, दिनेशभाऊ वानखडे, धीरज ठाकरे, दिवाकर भुरभुरे, अतुल कळंबे, कमलाकर जगताप, शरद वानखडे, अशोकराव बडकस, हरिदास भगत, भारतराव ढोणे, रामदास पाटील, शंकरराव टरके, राजकुमार ढोणे, केशव चौधरी, गजानन भोंबे, नितीन डोंगरे, शब्बीर शहा, गौरव चौधरी, दीपक चौधरी, केशव चौधरी, सचिन वानखडे,अंकुश देशमुख, स्वप्निल गंधे, नितीन कळंबे, सुधीर ढोके, मंगेश राऊत, श्रीधर देशमुख, चंद्रशेखर कडू, अतुल खुळे, करण उईके, पांडुरंग खेडकर, अनिकेत प्रधान, हर्षल कडू, नंदकिशोर पोलगावंडे, अमोल पन्नासे, अजय बाखडे, अभिजीत चौधरी, आशिष ताथोडे, आकाश मकेश्वर, तुषार लेवटे, ओम वानखडे, सागर वाघमारे, बावणे, गौरव देशमुख, बबलू उईके,राज निकाळजे, व शेकडो संत्रा उत्पादक शेतकरी उपस्थित होते.